दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१११ | शनिवार दि.११ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### लोकशाहीचा खरा कस ; व्यक्ती नव्हे, संस्थांची ताकद

लोकशाहीचा इतिहास सांगतो की कोणताही नेता कायमचा नसतो; पण संस्था टिकल्या तर राष्ट्र टिकते. निवडणूक जिंकणे म्हणजे लोकशाहीवर मालकी हक्क मिळणे नव्हे. तो केवळ पाच वर्षांसाठी मिळालेला घटनात्मक अधिकार असतो. त्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्याचे काम संसद, न्यायपालिका, घटनात्मक संस्था, माध्यमे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिक करतात.

# कर्जमाफी योजनेत मोठा बदल; दोन अटी रद्द

■ २०१९ च्या लाभार्थ्यांनाही आता २ लाखांपर्यंत कर्जमाफी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत महत्त्वाचे बदल करत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. २०१९ मधील महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही आता २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार असून, यापूर्वी त्यांच्यासाठी ठेवलेली ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करण्यात आली आहे. तसेच प्रोत्साहनपर अनुदानासाठी २०२६–२७ मधील पीककर्जाची नियमित परतफेड करण्याची अटही सरकारने मागे घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना ही घोषणा केली.**

मुख्यमंत्री म्हणाले की, आता मागील तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमित कर्जफेड केलेले सर्व शेतकरी प्रोत्साहनपर अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत. महायुतीच्या आमदारांनी ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट हटविण्याची मागणी केली होती. ही अट काढल्यामुळे सरकारवर ४ ते ५ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी दोन लाखांहून अधिक



शेतकऱ्यांना वंचित ठेवणे योग्य नसल्याचे सरकारने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीस यांनी सांगितले की, कर्जमाफीसंदर्भात प्रवीण परदेशी समितीने बँकिंग व्यवस्थेतील शिस्त कायम ठेवण्यावर भर दिला होता. वारंवार कर्जमाफी झाल्यास शेतकरी कर्जफेडीऐवजी पुढील कर्जमाफीची वाट पाहू शकतो, अशी समितीची चिंता होती. त्यामुळे पूर्वी काही अटी ठेवण्यात आल्या होत्या. मात्र शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून सरकारने त्या शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे.ङ्गमुख्यमंत्री यांनी कर्जमाफीच्या इतिहासाचाही आढावा घेतला. २०१७ मधील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमुक्ती योजनेत सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला होता. त्यानंतरच्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेत २०१७ च्या लाभार्थ्यांना वगळण्यात आले होते. त्यामुळे यावेळी पूर्वीचे लाभार्थीही नव्या योजनेत समाविष्ट करण्याचा निर्णय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी ◀◀ पान २ वर

# सरकार जात पाहून कारवाई करतेय!

■ नवनाथ वाघमारे यांचा सरकारवर आरोप; विलास घुले खून प्रकरणी केजमध्ये मोर्चा

केज । प्रतिनिधी

**भांडण सोडवायला गेलेले विलास घुले यांचा खून करण्यात आला परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बळी पडलेला ओबीसी जातीचा तरुण असल्याने पुरवणी जबाबात खा. बजरंग सोनवणे यांच्या मुलाचे नाव येऊन सुद्धा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलिस प्रशासन त्यांच्यावर कारवाई करीत नसल्याचा सनसनाटी आरोप ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी केज येथील मोर्चात केला. तसेच खा. बजरंग सोनवणे हे कदाचित भाजप मध्ये येतील म्हणून मुख्यमंत्री कारवाई करीत धजावत नसल्याचा गौप्य स्फोट केला.**



दि. १० जुलै रोजी, बीड जिल्ह्यातील टाकळी येथील वंजारा समाजाचा तरुण हा त्याच्या हॉटेलवर सुरू असलेले भांडण सोडविण्यासाठी गेला म्हणून चाकू हल्ल्यात विलास घुले याचा खून करण्यात आला होता. या प्रकरणी विलास घुले यांच्या मारेकऱ्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी. तसेच पुरवणी जवाब नाव असलेल्या खासदार बजरंग सोनवणे यांचे सुपुत्र गौरव सोनवणे यांना अटक करण्यात यावी. हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावे. मयत विलास घुले यांच्या पत्नीला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे आणि विलास घुले यांचे भाऊ फिर्यादी रमेश घुले यांना शस्त्रधारी पोलिसांचे संरक्षण द्यावे यासह इतर मागण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते तहसील कार्यालया पर्यंत मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी मोर्चामध्ये सहभागी असलेले ◀◀ पान २ वर

## कॉकरोच जनता पार्टी आता संसदेवर धडकणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था




विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर संसदेत चर्चा करावी, अशी मागणी कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) कडून करण्यात आली आहे. या मागणीसाठी सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली २० जुलैला संसदेवर मोर्चा काढण्यात येणार आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी (२० जुलै) संसदेवर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे कॉकरोच जनता पार्टीने जाहिर केले आहे. शिक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी याद्वारे केली जाणार आहे. जंतर–मंतरवर बेमुदत उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक या मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज १३ वा दिवस आहे. त्यांचे वजन सुमारे ७ किलोपेक्षा जास्त घटले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोनम वांगचुक यांच्याशी फोनवरून संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली, तसेच ठाकरे गटाने या आंदोलनाला पाठिंबा दिला ◀◀ पान २ वर

# ब्लॅक बॉक्सचा डेटा डाउनलोड

## अजित पवार यांच्या अपघाताच्या तपासाबाबत मुख्यमंत्र्यांची माहिती



मुंबई । प्रतिनिधी

राज्य विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाच्या तपासाबाबत महत्त्वाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या प्रकरणाचा तपास विविध स्तरांवर सुरू असून संबंधित यंत्रणांकडून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, तपासाशी संबंधित ब्लॅक बॉक्समधील डेटा पूर्णपणे डाउनलोड करण्यात आला असून, त्याचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. या तपासासाठी परदेशातील तज्ज्ञ आणि संबंधित तांत्रिक संस्थांचीही मदत घेतली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तपासादरम्यान पायलट सुमित कपूर यांच्याबाबतही विविध बाबींची पडताळणी करण्यात आली. त्यांची बँक ◀◀ पान २ वर

## राम मंदिर चोरीची रक्कम शेअर बाजारात गुंतवली

■ पोलिसांनी अनेक बँक खाती गोठवली; तपासात धक्कादायक खुलासे

अयोध्या । वृत्तसंस्था

राम मंदिरातील निधीच्या कथित गैरव्यवहार प्रकरणात तपास यंत्रणांना नवे धक्कादायक धागेदोरे मिळाले आहेत. चोरी केलेली रक्कम केवळ लपवलीच नाही, तर ती शेअर बाजारात आणि इतर आर्थिक गुंतवणुकीत वापरल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी आणि त्यांच्या नातेवाईकांची ३० बँक खाती गोठवली आहेत.

तपासादरम्यान आरोपी अनुकल्प मिश्रा याला त्याच्या



घरी नेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत त्याने सहआरोपी अविनाश शुक्ला याच्यासोबत दानपेटीतील कथित अपहाराची रक्कम शेअर बाजारात गुंतवल्याचे सांगितल्याची माहिती तपासाशी संबंधित सूत्रांनी दिली आहे. याशिवाय, आरोपींनी काही रक्कम व्याजाने दिली, तर काही पैसे नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तींच्या बँक खात्यांमध्ये ◀◀ पान २ वर

# मराठवाड्यात एटीएसची १५० ठिकाणी धाड

■ संभाजीनगर, जालना, बीड जिल्ह्यात छापेमारी,पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टीशी संबंध

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) शुक्रवारी मोठी आणि संवेदनशील कारवाई करत छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात एकाच वेळी १५० ठिकाणी धाडसत्र राबवले. पाकिस्तानस्थित गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी कथित सोशल मीडिया संपर्काच्या तपासातून ही कारवाई करण्यात आली असून, विविध ठिकाणांहून १३ संशयितांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती एटीएसच्या सूत्रांनी दिली. एटीएसच्या माहितीनुसार, छत्रपती ◀◀ पान २ वर

# रक्तदाब, मधुमेहासह ३९ अत्यावश्यक औषधांच्या किमतीत घट

■ सर्वसामान्यांना दिलासा; केंद्र सरकारचा महत्वपुर्ण निर्णय



दिल्ली । वृत्तसंस्था

आरोग्यसेवा कमी खर्चिक करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राष्ट्रीय औषध किंमत निर्धारण प्राधिकरणाने ३९ अत्यावश्यक औषधांच्या किमती निश्चित केल्या आहेत. या निर्णयामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, संसर्ग आणि इतर गंभीर आजारांवरील अनेक औषधे कमी किंमतीत उपलब्ध होणार आहेत. सरकारच्या या निर्णयाचा फायदा लाखो रुग्णांना होणार असून, औषधांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

नवीन दर निश्चित करण्यात आलेल्या औषधांमध्ये रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, कोलेस्टेरॉल, संसर्ग, डोळ्यांचे आजार आणि व्हिटॅमिन डी यांसह विविध औषधांचा समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने उच्च रक्तदाबावरील औषधे, मधुमेहावरील औषधे, हृदयविकारावरील औषधे, कोलेस्टेरॉल कमी करणारी औषधे, अँटिबायोटिक्स, डोळ्यांसाठी वापरली जाणारी औषधे, व्हिटॅमिन ◀◀ पान २ वर

### नियम मोडल्यास कठोर कारवाई

जर एखाद्या कंपनीने सरकारने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा जास्त रक्कम आकारली, तर आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत त्या अतिरिक्त रकमेची व्याजासह वसुली करून ती सरकारी तिजोरीत जमा केली जाणार आहे. भविष्यात या यादीतील औषधे नव्याने बाजारात आणणाऱ्या कंपन्यांनाही सरकारने निश्चित केलेल्या किमतींचे पालन करावे लागणार आहे. त्यामुळे सर्व कंपन्यांसाठी एकसमान किंमत धोरण लागू राहील.

## थोडक्यात...

### पुन्हा युद्धाचा भडका, होर्मुझ बंद?

तेहरान : अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा युद्धाचा भडका उडाला आहे. अमेरिकेने इराणवर दोन दिवसांत १७० हल्ले केले. त्यानंतर इराणने प्रत्युत्तर देत कतार, कुवैत आणि बहरीनमधील अमेरिकन लष्करी तळांवर मोठे ड्रोन हल्ले केले आहेत. दुसरीकडे अमेरिका–इराण संघर्ष पुन्हा पेटल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भाव वाढले आहेत. होर्मुझचा मार्ग इराणने रोखून धरल्यामुळे जगावर पुन्हा इंधन संकटाची भीती निर्माण झाली आहे. इराणच्या बुशहर येथील एकमेव अणुऊर्जा प्रकल्पाजवळ अमेरिकेने हवाई हल्ला केला. हल्ला शुक्रवारी दुपारी १२ च्या सुमारास झाला. या हल्ल्यात अणुऊर्जा प्रकल्पाचे किती नुकसान झाले, याची माहिती देण्यात आलेली नाही. इराणने मात्र प्रकल्पावर हल्ला झाल्याचे वृत्त फेटाळले आहे.

### बिहारमध्ये शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीजपुरवठा

पाटणा: शेतकऱ्यांना दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा देण्याचे निर्देश बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. पटना येथे केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या उपस्थितीत नुकतीच उच्चस्तरीय आढावा बैठक झाली. या बैठकीमध्ये शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीजपुरवठा करण्याचे निर्देश मुख्यमंत्री चौधरी यांनी दिले. मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांना दररोज सकाळी ६ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत कृषी फीडरद्वारे कोणत्याही अडथळ्याशिवाय वीजपुरवठा देण्यात यावा. तसेच राज्यात नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना, पीएम–कुसुम योजना, फ्लोटिंग सोलर प्रकल्प आणि ग्रीन हायड्रोजन धोरण यांनाही गती देण्याचे आदेश देण्यात आले.

### राजपाल यादव पुन्हा जेलमध्ये जाणार

नवी दिल्ली: बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेते आणि विनोदी कलाकार यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा कायदेशीर धक्का बसला आहे. चेक बाऊन्सशी संबंधित सात प्रकरणांमध्ये कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोषसिद्धी आणि तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. राजपाल यादव यांनी दाखल केलेल्या पुनर्विचार याचिका न्यायालयाने फेटाळल्याने त्यांच्यासमोरील कायदेशीर अडचणी वाढल्या आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे राजपाल यादव यांना पुन्हा कारावासाला सामोरे जावे लागू शकते. हे प्रकरण अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक व्यवहार आणि कर्जाच्या परतफेडीशी संबंधित आहे. वृत्तांनुसार, चित्रपट निर्मितीसाठी घेतलेल्या कर्जातून हा वाद निर्माण झाला आणि त्यानंतर जारी करण्यात आलेले अनेक धनादेश अनादरित झाल्याने संबंधित कंपनीने न्यायालयात धाव घेतली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० जुलै २०२६


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६३.०० क्विंटल | २,४४० | २,८४१ | २,६६४ |
| ज्वारी/हायब्रिड : १७१.०० क्विंटल | २,३०० | ४,१०० | २,९९३ |
| मका/लोकल: ३९.५० क्विंटल | २,००० | २,२४९ | २,१२४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १६४.५० क्विंटल | २,४०० | ३,५११ | २,७९३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,०३१ | ६,०३१ | ६,०३१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,५९० | ६,१०० | ५,७९६ |

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारू, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
सौ.संध्या श्रीराम टेकाळे(शिंदे) मुख्याध्यापिका मो.९४२१३४८४७४
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते मो.9075387638
सौ.डॉ.जयश्री रोहन मालुरे(टेकाळे) M.B.B.S. मो.७७४३९९०९८८ विठाई हॉस्पिटल,कळंब
डॉ.रोहन मालुरे M.B.B.S.,MD,Medicine विठाई हॉस्पिटल,कळंब मो.९८६०५६०५५७

## अग्रलेख

# लोकशाहीचा खरा कस ; व्यक्ती नव्हे, संस्थांची ताकद

लोकशाहीचा इतिहास सांगतो की कोणताही नेता कायमचा नसतो; पण संस्था टिकल्या तर राष्ट्र टिकते. निवडणूक जिंकणे म्हणजे लोकशाहीवर मालकी हक्क मिळणे नव्हे. तो केवळ पाच वर्षांसाठी मिळालेला घटनात्मक अधिकार असतो. त्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्याचे काम संसद, न्यायपालिका, घटनात्मक संस्था, माध्यमे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिक करतात.

भारतात २०१४ पासून केंद्रात स्थिर बहुमताचे सरकार आहे. या काळात महामार्ग, डिजिटल इंडिया, जीएसटी, पायाभूत सुविधा, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण अशा अनेक क्षेत्रांत महत्त्वाचे निर्णय झाले. त्याच काळात नागरिकत्व दुरुस्ती कायदा () २०१९, कलम ३७० रद्द (५ ऑगस्ट २०१९), शेतकरी कायदे (२०२०) आणि त्यांची १९ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेली माघार, तसेच २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेला महिला आरक्षण कायदा अशा अनेक निर्णयांवर देशभरात तीव्र सार्वजनिक चर्चा झाली. या सर्व घटनांनी एकच गोष्ट स्पष्ट केलीलोकशाहीत सरकारला निर्णय घेण्याचा अधिकार आहे; पण त्या निर्णयांवर प्रश्न विचारण्याचाही नागरिकांना तितकाच घटनात्मक अधिकार आहे. अमेरिकेत ६ जानेवारी २०२१ रोजी कॅपिटॉलवर झालेल्या हल्ल्यानंतर न्यायालये, काँग्रेस आणि स्वतंत्र तपास यंत्रणांनी आपापल्या घटनात्मक अधिकारांचा वापर केला. त्यानंतर राष्ट्राध्यक्षांच्या निर्णयांवर न्यायालयीन आव्हाने, संसदीय चौकशी आणि सार्वजनिक चर्चा सुरूच राहिली. काही राजकीय गटांनी अमेरिकेच्या २५ व्या घटनादुरुस्तीचाही उल्लेख केला; मात्र ती राजकीय चर्चेचा भाग राहिली, घटनात्मक प्रक्रियेत वापरली गेली नाही. या संपूर्ण प्रक्रियेत व्यक्तीपेक्षा संस्थांचे महत्त्व अधोरेखित झाले. भारतातही न्यायपालिकेने वेळोवेळी सरकारच्या निर्णयांवर सुनावण्या घेतल्या आहेत. माहितीचा अधिकार कायदा (२००५), लोकपाल कायदा (२०१३), सर्वोच्च न्यायालयाचे विविध घटनात्मक निर्णय आणि संसदीय समित्यांचे अहवाल हे लोकशाहीतील नियंत्रण आणि संतुलनाचे आधारस्तंभ आहेत. सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करणे जितके अयोग्य, तितकेच प्रत्येक निर्णयाला प्रश्न न विचारता स्वीकारणेही लोकशाहीच्या आत्म्याशी विसंगत आहे. आज भारतीय लोकशाहीसमोर सर्वात मोठे आव्हान विरोधकांचे अस्तित्व नसून सार्वजनिक चर्चेची गुणवत्ता आहे. मतभेदांना देशभक्ती किंवा देशद्रोहाच्या चौकटीत बसविण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सामाजिक माध्यमांनी संवादाचा वेग वाढवला; पण अनेकदा तथ्यांपेक्षा भावना प्रभावी ठरू लागल्या. लोकशाहीत असहमती ही दुर्बलता नसून सुधारण्याची संधी असते.

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत ''लोकशाही गणराज्य'' ही संकल्पना केवळ मतदानापुरती मर्यादित नाही. ती अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य, समानता आणि उत्तरदायित्व यांवर उभी आहे. सरकारला धोरणे ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे; न्यायालयांना त्यांची घटनात्मक तपासणी करण्याचे स्वातंत्र्य आहे; संसदेला सरकारला उत्तरदायी धरण्याचा अधिकार आहे; आणि नागरिकांना शांततामय मार्गाने प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. लोकशाहीची गुणवत्ता नेत्यांच्या लोकप्रियतेने नव्हे, तर टीका सहन करण्याच्या क्षमतेने मोजली जाते. मजबूत सरकार देशाला दिशा देऊ शकते; पण मजबूत संस्था त्या दिशेला वैधानिक आधार देतात. म्हणूनच भारताची लोकशाही अधिक सक्षम करण्याचा मार्ग व्यक्तिपूजेत नाही, तर संविधान, संस्था आणि नागरिकांच्या स्वातंत्र्यावर दृढ विश्वास ठेवण्यात आहे. लोकशाहीचे खरे यश टाळ्यांच्या आवाजात नसते; ते प्रश्न विचारणाऱ्या नागरिकात, उत्तर देणाऱ्या सत्तेत आणि निर्भयपणे आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या संस्थांमध्ये असते.

# डॉक्टरांवरील हिंसाचाराचा परिणामं

## रुग्णसेवा आणि समाजाच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न

अशा प्रकारच्या घटनांकडे पाहिल्यानंतर प्रत्येक डॉक्टरच्या मनात एक अस्वस्थ करणारा प्रश्न निर्माण होतो जर रुग्णसेवा करताना डॉक्टरच्या स्वतःच्या सुरक्षिततेची हमी नसेल, तर तो अत्यंत कठीण परिस्थितीत सर्वोत्तम वैद्यकीय निर्णय कसा घेणार? डॉक्टरांच्या आयुष्यात अशा घटना अत्यंत अनपेक्षित आणि मानसिकदृष्ट्या हादरवून टाकणाऱ्या असतात. वैद्यकीय क्षेत्रात प्रत्येक निर्णय हा रुग्णाच्या जीवाशी संबंधित असतो. विशेषतः अतिगंभीर रुग्ण, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया, सुप्रामेजर ऑपरेशन्स किंवा अत्यंत जोखमीच्या उपचारांमध्ये डॉक्टरांना शांत मनाने, आत्मविश्वासाने आणि पूर्ण एकाग्रतेने निर्णय घ्यावे लागतात.

परंतु जर त्या निर्णयांवर हिंसाचाराची, धमकीची किंवा गैरसमजाची सावली असेल, तर त्याचा परिणाम केवळ डॉक्टरांवर होत नाही, तर शेवटी त्याचा सर्वात मोठा फटका रुग्णाला आणि संपूर्ण समाजाला बसतो. कारण वैद्यकीय उपचारांमध्ये केवळ यंत्रणा, औषधे किंवा तंत्रज्ञान पुरेसे नसते; त्यामागे डॉक्टरांचे ज्ञान, अनुभव, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. भीतीच्या वातावरणात घेतलेले निर्णय आणि निर्भय मनाने घेतलेले निर्णय यामध्ये फरक असतो. एक तज्ज्ञ डॉक्टर घडणे ही अनेक वर्षांची कठीण प्रक्रिया असते. एका विद्यार्थ्याला पासून पदव्युत्तर शिक्षण आणि त्यानंतर सुपरस्पेशालिटीपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक वर्षांचा कठोर अभ्यास, सातत्य, संयम, प्रचंड मेहनत, मानसिक ताकद आणि त्याग आवश्यक असतो. या प्रवासात केवळ डॉक्टर आणि त्याचे कुटुंबच नाही, तर संपूर्ण समाज आणि शासनाचीही मोठी गुंतवणूक असते. एका तज्ज्ञ डॉक्टरच्या प्रशिक्षणासाठी सरकारकडून मोठ्या प्रमाणात संसाधने, अत्याधुनिक सुविधा, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि अनेक वर्षांचा वेळ खर्च होतो. म्हणूनच एका डॉक्टरकडे केवळ एका व्यक्तीच्या रूपात न पाहता, समाजाची अमूल्य संपत्ती म्हणून पाहण्याची गरज आहे. एक न्यूरोसर्जन, हृदयरोगतज्ज्ञ, कॅन्सर तज्ज्ञ किंवा कोणताही सुपरस्पेशालिस्ट डॉक्टर जेव्हा एखाद्या गंभीर रुग्णावर उपचार करतो, तेव्हा तो केवळ एक प्रक्रिया करत नसतो; तो आपल्या अनेक वर्षांच्या शिक्षणाचा, अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग करून एका जीवनासाठी संघर्ष करत असतो. काही वेळा सर्वोत्कृष्ट उपचार, अत्याधुनिक सुविधा आणि प्रामाणिक प्रयत्न असूनही रुग्णाचा अपेक्षित परिणाम होत नाही. हे वैद्यकीय विज्ञानाचे वास्तव आहे. प्रत्येक आजारावर १०० टक्के नियंत्रण मिळवणे आजच्या आधुनिक वैद्यकशास्त्रातही शक्य नाही. समाजाने हे समजून घेतले पाहिजे की डॉक्टर आणि रुग्ण हे एकमेकांचे विरोधक नाहीत. डॉक्टर हा रुग्णाचा सर्वात मोठा सहकारी आणि हितचिंतक असतो. त्याच वेळी डॉक्टरांनीही बदलत्या सामाजिक परिस्थितीची जाणीव ठेवून अधिक पारदर्शक संवाद, सहानुभूतीपूर्ण वर्तन आणि उपचारांबाबत स्पष्ट माहिती देण्यावर भर दिला पाहिजे. परंतु हिंसा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. कारण हिंसाचारामुळे एका डॉक्टरचा आत्मविश्वास कमी होतो, त्याच्या निर्णयक्षमतेवर परिणाम होतो आणि अप्रत्यक्षपणे त्याचा परिणाम अनेक रुग्णांच्या उपचारांवर होऊ शकतो.आज गरज आहे ती डॉक्टर आणि समाज यांच्यातील विश्वासाचे नाते पुन्हा मजबूत करण्याची. सुरक्षित डॉक्टर म्हणजे सुरक्षित रुग्णसेवा आणि सक्षम आरोग्य व्यवस्था.डॉक्टरांनी आपला सेवाभाव, नम्रता आणि समर्पण कायम ठेवावे; आणि समाजाने डॉक्टरांच्या ज्ञानाचा, मेहनतीचा आणि जबाबदारीचा आदर करावा.कारण एका उत्तम डॉक्टरच्या मागे अनेक वर्षांचा संघर्ष असतो, आणि एका सुरक्षित डॉक्टरच्या हातूनच हजारो जीवांना आशेचा आधार मिळतो.

**डॉ.किणीकर हनुमंत**
**न्यूरोसर्जन लातूर**

## पान १ वरून...

### कर्जमाफी योजनेत मोठा

होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे २ लाख रुपयांपेक्षा जास्त थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वी २ लाखांच्या मर्यादेपेक्षा एक रुपयाने जरी कर्ज जास्त असले तरी अशा शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळत नव्हती. मुख्यमंत्री यांनी विरोधकांच्या टीकेलाही उत्तर देताना सांगितले की, या योजनेत केवळ १२ ते १३ हजार कोटी रुपयांचा लाभ मिळणार किंवा ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होणार असल्याचे दावे चुकीचे आहेत. ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी योजना असल्याचा दावा त्यांनी केला.याशिवाय महायुती सरकार दरवर्षी शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २० ते २५ हजार कोटी रुपयांचे अनुदान देत असून, कृषी विभागासाठी विविध योजना आणि अनुदानांसह सुमारे ९५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

-----------

### कॉकरोच जनता पार्टी

आहे. दिल्लीतील प्रचंड पावसातही विद्यार्थ्यांचे आंदोलन (२० वा दिवस) सुरू असून, संरक्षणासाठी ताडपत्री आणि तंबू उभारण्यास दिल्ली पोलिसांनी परवानगी दिली नसल्याचा आरोप सीजेपीचे नेते अभिजीत दिपके यांनी केला आहे. नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणाविरोधात सोशल मीडियातून उभी राहिलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या माध्यमातून देशभर विद्यार्थी आंदोलन सुरू असून, त्याचाच भाग म्हणून सोनम वांगचुक जंतर-मंतर येथे आमरण उपोषण करत आहेत. आंदोलनात सहभागी विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधताना अरविंद सावंत यांनी विद्यार्थ्यांचा लढा न्याय्य असल्याचे सांगितले. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

---------

### सरकार जात पाहून

ओबीसीचे नेते नवनाथ वाघमारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस प्रशासन यांच्यावर टीका करताना म्हणाले की, हे सरकार आणि प्रशासन जात पाहून कार्यवाही करीत असल्याचा आरोप केल. तसेच खा. बजरंग सोनवणे यांचे सुपुत्र गौरव सोनवणे यांच्यावर का कार्यवाही होत नाही? याचा समाचार घेताना ते म्हणाले की कदाचित बजरंग सोनवणे हे भाजपमध्ये प्रवेश करतील या आशेवर मुख्यमंत्री कारवाई करण्यास बजावत नसतील. ङ्गया मोर्चामध्ये ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांच्यासह मयत विलास घुले यांच्या पत्नी विलास घुले यांचे भाऊ रमेश घुले आणि समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच यावेळी पोलिसांचा मोठा पाऊस फाटा देखील तैनात करण्यात आलेला होता.

----------

### राम मंदिर चोरीची रक्कम शेअर

जमा करून नंतर पुन्हा स्वतःच्या खात्यांमध्ये वळवले, अशीही माहिती तपासातून समोर आली आहे. पोलिसांनी आरोपी आणि त्यांच्या नातेवाईकांची ३० बँक खाती गोठवली आहेत. या खात्यांमधील व्यवहार त्यांच्या अधिकृत उत्पन्नाशी विसंगत असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. आर्थिक तपास यंत्रणा आता या खात्यांमधील व्यवहार, शेअर बाजारातील गुंतवणूक, मालमत्ता खरेदी आणि रोख रकमेच्या हालचाली यांचा बारकाईने अभ्यास करत आहे. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींच्या घरांची पुन्हा झडती घेतली. यावेळी फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि पंचांच्या उपस्थितीत कागदपत्रे, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, गुंतवणुकीशी संबंधित नोंदी आणि इतर पुरावे तपासण्यात आले. याच कारवाईत दानाच्या बनावट पावत्याही जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, आरोपींनी मंदिरातील दान मोजणी प्रक्रियेतील त्रुटींचा फायदा घेतला. संशय येऊ नये म्हणून दानपेटीतील रक्कम थोड्या-थोड्या प्रमाणात बाहेर काढली जात होती. ही रक्कम लगेच खर्च करण्याऐवजी ती विविध आर्थिक साधनांमध्ये गुंतवून त्यातून नफा कमावण्याचा प्रयत्न केल्याचा संशय आहे. आता तपास केवळ चोरी झालेली रक्कम परत मिळवण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. ही रक्कम नेमकी कुठे गुंतवली गेली, त्यातून किती नफा झाला, त्या नफ्याचा वापर कसा झाला आणि त्याचा फायदा कोणाला झाला, याचा शोध घेण्यासाठी आर्थिक तज्ज्ञांचीही मदत घेतली जात आहे. ब्रोकरेज खाती, ट्रेडिंग स्टेटमेंट्स, मोबाईल गुंतवणूक ॲप्स, डिजिटल पेमेंट व्यवहार आणि इतर आर्थिक नोंदींची तपासणी सुरू आहे. दरम्यान, तपासादरम्यान काही आरोपींकडे त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे या मालमत्ता चोरीच्या पैशातून खरेदी करण्यात आल्या का, याचाही तपास सुरू आहे. या प्रकरणामुळे राम मंदिरातील दान व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, पोलिसांकडून आर्थिक व्यवहारांचा प्रत्येक धागा तपासला जात आहे. पुढील तपासातून आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

---------

### ब्लॅक बॉक्सचा डेटा

खाती, विमा पॉलिसी आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीची चौकशी करण्यात आली असून, आतापर्यंत कोणतीही संशयास्पद बाब आढळलेली नसल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. तसेच उपलब्ध सर्व सीसीटीव्ही आणि इतर फुटेजचेही विश्लेषण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे सांगितले की, अशा प्रकारच्या अपघातांच्या तपासासाठी तांत्रिक विश्लेषणामुळे अनेकदा तीन ते चार वर्षांचा कालावधी लागू शकतो. मात्र केंद्र सरकारने संबंधित तपास यंत्रणांना प्रक्रिया शक्य तितक्या जलद पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण आणि अंतिम निष्कर्ष अधिकृत तपास अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होतील, असेही त्यांनी सूचित केले.

--------

### मराठवाड्यात एटीएसची १५०

संभाजीनगरमधून सर्वाधिक १० जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. यामध्ये वैजापूर येथील २, मिसारवाडीतील ३, हर्सूलमधील १, आरिफ कॉलनीतील १, बायजीपुरा येथील १ तसेच शहरातील इतर भागांतील २ संशयितांचा समावेश आहे. याशिवाय जालना जिल्ह्यातून २ आणि बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील पात्रूड येथून १ संशयिताला ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक तपासात पाकिस्तानस्थित गँगस्टर शहजाद भट्टीशी संबंधित सोशल मीडिया किंवा डिजिटल युझर आयडीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील काही तरुण संपर्कात असल्याचा संशय एटीएसला आला आहे. या प्रकरणात एकूण १४ जण तपास यंत्रणेच्या रडारवर असून, त्यांचा शोध आणि पडताळणीचे काम राज्यभर सुरू आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांची अज्ञात स्थळी सखोल चौकशी सुरू असून, त्यांचे मोबाईल फोन, सोशल मीडिया अकाउंट्स आणि डिजिटल व्यवहारांची तपासणी केली जात आहे. या तपासातून आणखी काही महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता एटीएसने व्यक्त केली आहे. दरम्यान, या कारवाईनंतर बीड, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक सतर्क करण्यात आली आहे. संशयितांचे नेटवर्क किती व्यापक आहे, त्यांच्या संपर्कामागील नेमका उद्देश काय होता आणि हा केवळ सोशल मीडियावरील संवाद होता की त्यामागे आणखी गंभीर कट होता, याचा सर्वंकष तपास सुरू असल्याचे एटीएसने स्पष्ट केले आहे. तपास यंत्रणांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत, अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचणे योग्य नसल्याचे नमूद केले आहे.

---------

### रक्तदाब, मधुमेहासह ३९ अत्यावश्यक

डी पूरक औषधे व काही विशेष इंजेक्शन्स आणि ओरल सोल्यूशन्स यांचा समावेश आहे. राष्ट्रीय औषध किंमत निर्धारण प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे की, कोणतीही औषध उत्पादक कंपनी किंवा विक्रेता सरकारने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त किंमत आकारू शकणार नाही. यासाठी सर्व औषध विक्रेते आणि वितरकांनी दुकानात औषधांच्या किमतींची यादी ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक असेल. ग्राहकांना किंमती सहज पाहता याव्यात यासाठी ही यादी दुकानाच्या दर्शनी भागात लावावी लागेल. निश्चित दरापेक्षा जास्त किंमत आकारल्यास संबंधित कंपनीविरुद्ध कारवाई केली जाईल, अशी नियमावली करण यात आली आहे. या निर्णयामुळे अत्यावश्यक औषधांच्या किमतींमध्ये पारदर्शकता येणार असून रुग्णांना वाजवी दरात औषधे उपलब्ध होतील. विशेषतः रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकारासारख्या आजारांवर नियमित औषधे घेणाऱ्या रुग्णांचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.

------------

## पान ६ वरून...

### ऊस शेतात गांजाची लागवड

करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश कन्हाडकर, सहाय्यक फौजदार सोमनाथ कुलकर्णी, पोलीस हवालदार विश्वनाथ प्रधान, नरेन्द्र बांगर, पोलीस अंमलदार हनुमान इंगोले, संदीप गायकवाड व प्रशांत घोंगडे यांच्या पथकाने केली.

---------------

### खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षांच्या

आमरण उपोषण सुरू केले होते. यावेळी काही लोकांनी मध्यस्थी करून प्रकरण मिटवले होते परंतु तरीही दिपक जाधव हे पैसे देत नसल्याने दि १० जुलै शुक्रवार रोजी जाधव यांच्या निवासस्थानासमोर सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास नवनाथ पवार यांनी कुटुंबीयां समवेत येऊन विषारी औषध प्राशन केल्याचे सांगण्यात आले आहे.

------------

### तीन हजाराची लाच

तक्रारदाराने याबाबत बीड एसीबीकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी करून एसीबीने सापळा रचला. त्यानुसार आरोपी राठोड अण्णासाहेब गबरू याला ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक करण्यात आली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली एसीबी पथकाने केली.

------------

### पत्रकारांना प्रवानगी देऊन नगरपरिषद

शहरातील नागरिकांसाठी दाखवण्यात यावी म्हणजे बीड नगरपरिषद शहराच्या विकासासाठी आणि सर्वसामान नागरिकांसाठी नगरपरिषद काय निर्णय घेत आहेत आणि कोण कोणत्या योजना राबवत आहेत वगैरे याची माहिती सर्वसामान्य लोकांना मिळू शकेल, नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दाखवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रेस मिडिया, सोशल मिडिया वगैरे यांना नगरपरिषद सभागृहात बसण्याची परवानगी देऊन त्यांना सभागृहात बसण्याची जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी तुतारी गटाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे, या शिष्टमंडळात नगरसेवक अशोक काळे, नगरसेवक अय्युब खान पठाण, नगरसेवक अक्षय जाधव, नगरसेवक मसी भाई, नगरसेवक मोहसीन भाई, नगरसेवक रईस भाई आदी मान्यवर उपस्थित होते,

-------------

### बीड शहरात भटक्या कुत्र्यांचा वाढता

धावत भुंकत असल्याने अपघाताचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. स्थानिक नागरिकांनी नगरपालिकेने भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन कुत्र्यांचे निर्बीजीकरण, स्थलांतर आणि आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या समस्येकडे वेळेत लक्ष न दिल्यास नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागू शकतो, अशी चर्चा शहरात सुरू असून प्रशासनाने याची गंभीर दखल घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

----------

### सीईओ जितिन रहमान

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदर प्रशिक्षण केंद्र पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी कृषी अधिकारी अनिरुद्ध सानप, कृषीतज्ञ शिवराम घोडके यांच्यासह लोळदगावचे सरपंच, प्रशिक्षण केंद्राचे, संचालक, अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

-------------

### अवैध वाळू वाहतूक करणारा पिकअप

किंमत ९,०६,००० रुपये इतकी आहे. पोलीस कॉन्स्टेबल जितेंद्र आत्माराम ओव्हाळ यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४१९/ २०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (भा.न्या.स.) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि अतुलकुमार लांडगे, सपोनि समाधान दौड, पोह कल्याण राठोड, पोकॉ गोरक्ष डोके आणि फिर्यादी जितेंद्र ओव्हाळ यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

-----------

### अपघाताची वाट न पाहता

मोठा फरक निर्माण झाला आहे. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला गेल्यास चालकांचे नियंत्रण सुटण्याची शक्यता वाढली आहे. विशेषतः पावसाळ्यात चिखल आणि निसरड्या परिस्थितीमुळे दुचाकी वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत असून, चारचाकी वाहनांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावरून दररोज विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, रुग्णवाहिका तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना तातडीने साईड पट्ट्या भरून मार्ग सुरक्षित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सत्यप्रेम कोरडे, चिंतामणी कोळसे, हनुमान कोरडे, रंगनाथ सागर आणि रोहन डाके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. वेळेत उपाययोजना न केल्यास भविष्यात घडणाऱ्या अपघातांची जबाबदारी संबंधित विभागाची राहील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

------------

### महावितरणने तात्काळ उपाययोजना न केल्यास

निवेदनात विशेषतः पुसरा फाटा ते चिंचाळा मार्गावरील अतिउच्च दाबाच्या वीजवाहिनीचा खांब रस्त्याकडे कोलमडलेल्या अवस्थेत असून तो कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. हा मार्ग वर्दळीचा असल्याने मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही . तसेच पुसरा फीडरच्या पुसरा शिवारात तीन ठिकाणी वीजतारा अत्यंत लोबकळलेल्या अवस्थेत असल्याने गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, कृषी पंपांना नियोजित वेळेनुसार अखंडित वीजपुरवठा द्यावा, जळालेले ट्रान्सफॉर्मर व इतर बिघाड तातडीने दुरुस्त अथवा बदलावेत, धोकादायक वीजवाहिन्या व खांबांची त्वरित दुरुस्ती करावी तसेच नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. या सर्व मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शेतकरी व नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा महादेव सावंत राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्ष यांनी कार्यकारी अभियंता तेलगाव यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे

----------

### कर्जमाफी शेतकरी हक्क मोर्चाच्या

हे शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश आले असे प्रतिपादन शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांनी केले या वेळी शेतकऱ्याने कर्जमाफी योजनेतील अटी शिथिल केल्यामुळे शेतकऱ्यांनी स्वागत केले. शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने १४ जुलै रोजी शेतकरी आंदोलन आयोजित केले आहे या आंदोलनातील कर्ज माफी विषय मागे घेत सरकारच्या घोषणेच स्वागत परंतु बीड जिल्ह्यातील पीकविमासाठीचा शेतकरी हक्क मोर्चाचा लढा सुरूच राहणार आहे. सरकारच्या कर्जमाफी घोषणेचे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने फटाके वाजवून स्वागत केले आहे. या वेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, शामसुंदर आमटे, विश्वंभर सपकाळ मसुराम साळुंके, रामा साळुंके, सुधाकर काकडे,सुरेश साळुंके, हनुमान साळुंके, वरचक्ष साळुंके, दगडू साळुंके, वसंत साळुंके, देवराव साळुंके, सुग्रीव आमटे, मुरली आमटे, ईश्वर आमटे, संजय आमटे, सखाराम राऊत, आदि शेतकरी उपस्थित होते.

----------

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-३२१ दिनांक०४/०६/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान/ श्रीमती **खान सबाहत खान मुजीब, रा.नाईकवाडी मोहल्ला अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःचे नामे-**खान सबाहत खान मुजीब** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | खान सबाहत खान मुजीब | स्वतःचे | ०६/१२/१९९९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-३२० दिनांक०४/०६/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान/ श्रीमती **जोहरबतुल मुजीब खान, रा.नाईकवाडी मोहल्ला अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःचे नामे-**जोहरबतुल मुजीब खान** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | जोहरबतुल मुजीब खान | स्वतःचे | १०/१२/१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-३२३ दिनांक०४/०६/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **तलहा मुजीब पठाण, रा.नाईकवाडी मोहल्ला अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःचे नामे-**तलहा मुजीब पठाण** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | तलहा मुजीब पठाण | स्वतःचे | ०१/०५/२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-३२२ दिनांक०४/०६/२०२६

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **मुसैफ मुजीब खान, रा.नाईकवाडी मोहल्ला अंबड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःचे नामे-**मुसैफ मुजीब खान** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | मुसैफ मुजीब खान | स्वतःचे | २९/०१/२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०७/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

## पायी दिंडी सोहळ्यात भक्तांनी सहभागी व्हावे : लोमटे

गेवराई : जनसेवा सद्गुरु सुभाष बाप्पा महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाने मलकापूर ते पंढरपूर पायी दिंडीचे आयोजन केले असून या दिंडी सोहळ्यास बहुसंख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे वाहन मलकापूर संस्थांचे मठाधिपती एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी जनसेवानंद सुभाष बाप्पा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व एकनाथ महाराज लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८ जुलै रोजी मलकापूर ते पंढरपूर वारीचे प्रस्थान होणार असून. या पायी दिंडी सोहळ्यात भाविक भक्तांनी पायीदिंडी सोहळा सहभागी व्हावी असे आवाहन एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.या दिंडी सोहळ्यात जाणाऱ्या भक्तांसाठी नाष्ट्याची व्यवस्था महादेव शिंदे, नामदेव लोमटे, रामहरी लोमटे ,अरविंद जगदाळे ,गणेश लोमटे ,सौ रंजना अंधारे, नवनाथ वाघज,सनि शिंदे ,सुरज मोरे ,शहाजी चव्हाण ,शिवाजी पाटील, समस्त ग्रामस्थ उपळाई उषा शिंदे व भारत वागज यांनी केले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.११ जुलै २०२६


# पाटबंधारे विभागाच्या मुख्य प्रवेशद्वारातच चहाचे दुकान

## अतिक्रमण हटविल्यानंतर शासकीय आवारात व्यवसाय सुरू





बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील वाहतूक कोंडी व वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्त कारवाई करत शहरातील मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविली. या कारवाईचे शहरवासीयांनी स्वागत केले असून वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या कामगिरीचेही कौतुक होत आहे. मात्र, अतिक्रमणातून हटविण्यात आलेल्या एका चहावाल्याने थेट पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आतच चहाचे दुकान सुरू केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयाच्या आवारात व्यवसाय करण्यास परवानगी कोणी दिली, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या दुकानामुळे कार्यालयात ये-जा करणारे अधिकारी, कर्मचारी व नागरिक यांना अडथळा निर्माण होत आहे. संबंधित चहावाला नागरिकांशी उद्धटपणे वागत असून कार्यालयात जाणाऱ्यांना दुसऱ्या प्रवेशद्वाराचा वापर करण्याचा सल्ला देत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयातील शिस्त आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून एस. एन. पवार कार्यरत आहेत. शासकीय कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारात व्यवसाय सुरू असताना संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष का केले? संबंधित व्यक्तीस अधिकृत परवानगी देण्यात आली आहे का? अथवा शासकीय जागा भाड्याने देण्यात आली आहे का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी उपस्थित केला आहे. एका बाजूला शहरातील अतिक्रमणांवर कठोर कारवाई सुरू असताना दुसऱ्या बाजूला शासकीय कार्यालयाच्या आवारातच व्यवसाय सुरू राहणे ही बाब गंभीर असून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर करावी व दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस. एन. पवार यांनी संबंधित चहावाल्यास शासकीय जागा वापरण्याची अधिकृत परवानगी दिली आहे का? अथवा शासकीय जागा किरायाने देण्यात आली आहे का? याबाबत प्रशासनाने तातडीने खुलासा करून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासन कठोर कारवाई करत असताना शासकीय कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातच व्यवसाय सुरू राहणे ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. संबंधित जागा तातडीने मोकळी करून जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणीही पुढे येत आहे.




## आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

बीड। प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या संपूर्णता अभियान २.० चा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात सविस्तर आढावा घेतला. वडवणी तालुक्याचा विकास आराखडा गतिमान करतानाच, यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी यंत्रणेला दिला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर काळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकिसन इघारे यांच्यासह विविध संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी वडवणी तालुक्यातील आरोग्य, शिक्षण, जन्म-मृत्यू दर आणि शेतीविषयक प्रयोगांची सखोल माहिती घेतली. तालुक्यात जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून झालेले नदी खोलीकरणाचे काम कौतुकास्पद असून, त्यांना सोबत घेऊन काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, तालुक्यातील नाला खोलीकरण आणि शेततळे खोलीकरणाच्या कामांना अधिक गती देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी स्वतः विशेष प्रयत्न करावेत, असे आदेश त्यांनी दिले. कृषी विभागाचा आढावा घेताना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी पोकरा योजनेतील त्रुटींवर बोट ठेवले. वडवणी तालुक्यात पोकरा अंतर्गत रेशीम शेतीचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. आगामी काळात रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेशही त्यांनी दिले. यासोबतच, शासनाच्या धोरणानुसार मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला सौर पंप उपलब्ध करून देण्याची सूचना त्यांनी कृषी व महावितरणच्या अधिकाऱ्यांना केली.ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी आरसेटी प्रशिक्षणे, मुद्रा बँक कर्ज योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, आणि प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या आर्थिक योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देशही देण्यात आले. याशिवाय, ग्रामीण भागातील प्रलंबित घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करणे आणि आरोग्य उपकेंद्रांच्या दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या.

## पाटोदा येथील संगमेश्वर मंदिरात 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह




पाटोदा । प्रतिनिधी

अयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या देणगी व्यवस्थापनात कथित गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत काँग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी (दि. १०) पाटोदा येथील संगमेश्वर मंदिर परिसरात 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह करण्यात आले. नंतर श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे निवेदन पाटोदा पोलीस ठाण्यात देण्यात आले.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशानुसार राज्यभर ९ ते १४ जुलैदरम्यान हे आंदोलन राबविण्यात येत आहे.

त्याअंतर्गत पाटोदा येथे सकाळी ११ वाजता संगमेश्वर मंदिरात सत्याग्रह करण्यात आला. यावेळी 'रघुपती राघव राजाराम' हे भजन, 'खरा तो एकची धर्म' आणि 'पसायदान' सादर करण्यात आले.सत्याग्रह दरम्यान पक्षाचे झेंडे न वापरता काँग्रेसचे दुपट्टे व पांढरी टोपी परिधान करण्यात आली. या सत्याग्रह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच रामभक्त आणि प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले. काँग्रेसने श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या देणगी व्यवस्थापनात अनियमितता झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सत्याग्रहानंतर स्थानिक पोलीस ठाण्यात श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र (न्यास) चे सहसचिव चंपत राय, ट्रस्टी अनिल मिश्रा आणि कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव, ज्येष्ठ शेतकरी नेते राजाभाऊ देशमुख, माजी सैनिक शहाजी नाईकनवरे, सुनील दादा जाधव, राहुल नागरगोजे, तानाजी जाधव, माणिक जाधव, दिलीप वाघमारे, नामदेव गाडेकर, बाबू देशमुख, शंकर घाडगे, बापू गायकवाड, शरद राऊत, गणेश जाधव, संजय नागरे, शिवाजी जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## कृषी अभ्यासक्रम प्रवेशासाठी आष्टी येथे सहायता केंद्र सुरू

आष्टी। प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ साठी कृषि व कृषि सलग्न अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी राज्यभर ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया दिनांक १० जुलै २०२६ पासून सुरू झाली आहे. प्रवेश अर्ज करताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणी सामोरे जावे लागते. त्यात प्रामुख्याने ऑनलाईन प्रवेश अर्ज कसा करावा? इच्छुक महाविद्यालयाचा सांकेतांक आणि प्राधान्यक्रम कसा द्यावा? योग्य महाविद्यालय कसे निवडावे? असे अनेक प्रश्न आणि संभ्रम विद्यार्थी तसेच पालक यांच्या समोर असतात. ग्रामीण भागातील मुलांच्या अडचणी लक्षात घेऊन, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सोईसाठी आनंद चॅरिटेबल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. भीमराव धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत सर, प्राचार्य डॉ. एस. आर. आरसुळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व सल्ला व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राद्वारे केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरण्याकरिता निःशुल्क सुविधा देण्यात आली आहे. सदर सुविधा केंद्राचा जास्तीत जास्त विद्यार्थांनी लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी पुढील नंबरवर संपर्क करा. प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ (९४२००१९९१८), समन्वयक प्रा. प्रवीण जाधव (८९९९५११०५२), प्रा. महेश साबळे (९०२१५२८१४९), श्री. दत्तात्रय क्षेत्रे (९४२२२३६४९८).

## मुक्ताई पालखीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी शिवसेनेतर्फे मोफत आरोग्य व औषधोपचार शिबिर-संतोष जाधव

बीड। प्रतिनिधी

संतश्रेष्ठ मुक्ताई पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवाभावातून शिवसेनेच्या वतीने रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाप्रमुख संतोष जाधव यांच्या पुढाकाराने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, गेल्या १५ वर्षांपासून संतोष जाधव व त्यांच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने मुक्ताई पालखीतील वारकऱ्यांची निस्वार्थ भावनेने सेवा केली जात असून, ही सेवेची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. शिबिरामध्ये वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक औषधोपचार तसेच तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वारकरी सेवेलाच ईश्वरसेवा मानत राबविण्यात येणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण असून, अधिकाधिक वारकऱ्यांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि तालुका प्रमुख संतोष जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नियमबाह्य शिक्षक समायोजन रद्द करा - भाऊसाहेब हंगे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागाअंतर्गत शिक्षकांचे समायोजन १० जुलै २०२६ रोजी करण्यात यावे असे आदेश शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी पत्राद्वारे गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले व त्यानंतर तालुकास्तरावर यंत्रणा तत्परतेने कामाला लागली .अचानक समा योजनामुळे शिक्षकांची धावपळ झाली . शिक्षक गडबडून गेले ही बाब लक्षात येताच कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाने माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण अधिकारी प्राथमिक यांना निवेदन देऊन प्रत्यक्ष भेट घेतली व होत असलेली समायोजन प्रक्रिया नियमबाह्य आहे तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या समायोजनाबाबतच्या शासन निर्णयाचा भंग करणारी आहे . ग्रामविकाच्या शासन निर्णयाप्रमाणे दरवर्षी ३१ जुलै पर्यंत पदोन्नती कराव्यात व पदोन्नती नंतर समायोजन करणे बंधनकारक आहे ही बाब संघटनेने माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली .शिष्टमंडळाने प्रत्यक्ष माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान व शिक्षणाधिकारी प्राथमिक चव्हाण मॅडम यांची भेट घेतली . त्यांना निवेदन दिले .१ तसेच पदोन्नती नंतर समायोजन करणे आवश्यक आहे असा प्रशासनाकडे आग्रह धरला .शिक्षण विस्तार अधिकारी, ग्रेड मुख्याध्यापक,पदवीधर इत्यादी पदोन्नती कराव्यात असे निवेदन दिले व त्यानंतर समायोजन करण्यात यावे अशी मागणी केली . याबाबत माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक सकारात्मक दिसून आले . शासन निर्णय प्रमाणे समायोजन करण्यात येईल असे शिष्टमंडळास आश्वासन दिले .चुकीच्या व नियमबाह्य समायोजनास कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचा विरोध आहे ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली . शिष्टमंडळामध्ये जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब हंगे,राहुल सुपेकर, भाऊसाहेब मिसाळ,' सूर्यकांत शिंदे,संजय दराडे,हकिम मणियार, स्वामी ढोकणे,सोमनाथ तांदळे इत्यादी पदाधिकारी होते. निवेदनाच्या प्रती माननीय विभागीय आयुक्त आणि सर्व गटशिक्षणाधिकारी तसेच कास्ट्राईब जनरलचे राज्य अध्यक्ष अनिल जाधवर,महासचिव सुभाष जगताप यांना देण्यात आलेल्या आहेत

## बीएलओंच्या उत्कृष्ट कार्याचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान

### विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील काम मुदतीपूर्वीच १०० टक्के पूर्ण

बीड। प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (बीएलओ) बीडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते अभिनंदन प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. या प्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील यांची उपस्थिती होती. भारत निवडणूक आयोगाच्या १४ मे २०२६ च्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओमार्फत घरोघरी भेटी देऊन गणना अर्जांचे वितरण आणि संकलन करण्याचा



अत्यंत महत्त्वाचा उपक्रम राबविला जात आहे. या पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या नियुक्त यादी भागातील सर्व मतदारांना प्रत्यक्ष गणना अर्जांचे वितरण करून ते स्वीकारले. तसेच, आयोगाच्या '' संगणक प्रणालीमध्ये बीएलओ ऍपद्वारे सर्व गणना अर्जांचे डिजिटल वितरण व स्वीकृतीची १०० टक्के प्रक्रिया अत्यंत जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने पूर्ण केली.

विशेष म्हणजे दि.२९ जुलै २०२६ पर्यंत चालणाऱ्या या मोहिमेचे संपूर्ण कामकाज या अधिकाऱ्यांनी नियोजित मुदतीपूर्वीच म्हणजेच दि.१० जुलै २०२६रोजी यशस्वीरित्या पूर्ण केले. बीएलओंच्या या तत्परता, प्रामाणिकपणा आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेमुळे निवडणूक प्रक्रियेला गती मिळाली असून त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच भविष्यातही याच समर्पित भावनेने काम करण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. श्री. मधुकर विश्वानाथ वाघ सहशिक्षक, प्राथमिक शाळा, बंदेवाडीता. केज, जि. बीड. (यादी भाग क्र. ८०, बंदेवाडी, २३२-केज विधानसभा मतदारसंघ))श्री. रामेश्वर भिमराव सुंबे, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, लोखंडवाडी ता. आष्टी, जि. बीड. (यादी भाग क्र. ८८, लोखंडवाडी, २३१-आष्टी विधानसभा मतदारसंघ)श्री. रामेश्वर भिमराव सुंबे, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, लोखंडवाडी ता. आष्टी, जि. बीड. यादी भाग क्र. ८८, लोखंडवाडी, २३१-आष्टी विधानसभामतदारसंघ)बीड जिल्ह्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार यादीतील सर्व मतदारांनी या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत आपले गणना अर्ज भरून घ्यावेत. नव्याने अद्ययावत होणाऱ्या मतदार यादीतील नोंदींच्या पडताळणीसाठी आपल्या भागातील बीएलओकडून अर्ज प्राप्त करून ते योग्यरित्या भरून द्यावेत, जेणेकरून हा कार्यक्रम विहित कालावधीत यशस्वी होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



**चौसाळा :** जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा येथे sir पडताळणी साठी नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. शाळेतील BLO कामकाज पाहणारे शिक्षक श्री तोताडे सर श्री घोडके सर श्री मस्के सर अतिशय तत्परतेने नागरिकांशी संपर्क साधून मॅपिंग करण्याचे काम करीत आहेत दिनांक ३० जून पासून सुरु झालेली ही पडताळणी २९ जुलै पर्यंत राबविण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी मतदार पडताळणी प्रक्रिया पूर्ण न केल्यास. त्यांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात येणार आहे करिता चौसाळा गावातील नागरिकांनी आपल्या परिवारातील सर्व मतदार सदस्य यांची मॅपिंग करून घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

# राज्यात केवळ ५६ टक्के क्षेत्रावर पेरण्या!

पुणे : राज्यात सर्वदूर मान्सूनचा पाऊस पोहोचला आहे, मात्र राज्यात अनेक भागांत पेरणीयोग्य पाऊस अजूनही झालेला नाही. जुलै महिन्याचा दुसरा आठवडा सुरू होऊनही राज्यात सरासरीच्या केवळ ५६ टक्के एवढ्याच पेरण्या झालेल्या आहेत.

ही धक्कादायक बाब कृषी विभागाच्या अहवालातून समोर आली आहे. राज्यात २०२६ च्या खरीप हंगामासाठी १ कोटी ४४ लाख ३६ हजार हेक्टर क्षेत्र पेरणीयोग्य असून आत्तापर्यंत केवळ ५६ टक्के पेरण्या झाल्याने राज्यातील निम्म्या क्षेत्रावर पेरण्या बाकी असल्याचे समोर आले आहे.

यंदा राज्यात मान्सूनचा पाऊस २३ ते २४ जूनपासून सुरू झाला होता. तर जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्रातील पश्चिमेकडील भाग व राज्यातील काही भागांत मुसळधार पाऊस पडला. तर राज्यातील उर्वरित भागांत पेरणीयोग्य पाऊस झाल्याने अनेकांनी पेरण्या केल्या आहेत. राज्यातील बहुतांश भागातील पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मागील वर्षी १० जुलै पर्यंत १ कोटी १५ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. पण यंदा १० जुलै अखेर मात्र ८१ लाख ३२ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. म्हणजे राज्यातील ४४ टक्के क्षेत्रावरील पेरण्या अजून बाकी आहेत. अमरावती विभागात सर्वांत जास्त क्षेत्रावर पेरणी झाली असून या विभागात २४ लाख हेक्टर म्हणजेच विभागातील ७६ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. तर ठाणे (कोकण) विभागात सर्वांत कमी म्हणजे ८ टक्के एवढी पेरणी झाली आहे.



विभागनिहाय पेरणीची आकडेवारी:

ठाणे - २९ हजार ८०५ हेक्टर - ८ टक्के नाशिक - ११ लाख २६ हजार हेक्टर - ५५ टक्के पुणे - ४ लाख ५ हजार हेक्टर - ३२ टक्के कोल्हापूर - २ लाख १३ हजार हेक्टर - २९ टक्के छ. संभाजीनगर - १३ लाख १२ हजार हेक्टर - ६१ टक्के लातूर - १६ लाख ४० हजार हेक्टर - ५८ टक्के अमरावती - २४ लाख १८ हजार हेक्टर - ७६ टक्के नागपूर - ९ लाख ८६ हजार हेक्टर - ५२ टक्के.

# पंधरा बियाणे कंपन्यांचे परवाने रद्द करणार - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



मुंबई : राज्यात बोगस व निकृष्ट सोयाबीन बियाण्यांचा पुरवठा करणाऱ्या १५ बियाणे कंपन्यांच्या विक्रीवर बंदी घालून त्यांचे परवाने रद्द करण्यात येतील, अशी घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत केली.

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, ''विदर्भातील अकोला, अमरावतीसह अन्य जिल्ह्यांमध्ये निकृष्ट सोयाबीन बियाण्यांमुळे हजारो शेतकरी अडचणीत आले आहेत. मोठ्या प्रमाणावर पेरणी करूनही उगवण झाली नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. त्यामुळे संबंधित कंपन्यांवर तातडीने कारवाई करावी.'' त्यावर उत्तर देताना कृषिमंत्री भरणे म्हणाले, ''अकोला, वर्धा, गडचिरोलीसह काही जिल्ह्यांत सोयाबीनची अपेक्षित उगवण झाली नसल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणात शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित कंपन्यांविरुद्ध बियाणे कायदा, १९६६, बियाणे नियम, १९६८ आणि बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ अंतर्गत कारवाई करण्यात येईल. संबंधित १५ कंपन्यांचे परवाने रद्द करून त्यांच्या बियाण्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात येईल.'' भरणे यांनी रवी सीड्स अँड रिसर्च, बूस्टर क्रॉप सायन्स, तिरुपती सीड्स, पार्श्वा ॲग्रीजिनेटिक्स एलएलपी, इनोवेग ॲग्रो, बालाजी ॲग्रो, उत्तम सीड्स, परम ॲग्रो सीड्स, जे.एस. सीड्स, त्रिमूर्ती सीड्स, धनलक्ष्मी क्रॉप सायन्स, विगोर सीड्स, सारस सीड्स, इगल सीड्स अँड बायोटेक आणि ममता सीड्स या कंपन्यांचा कारवाईत समावेश असल्याचे सांगितले..

# पोल्ट्री फार्म उभारताना अशी घ्यावी लागते काळजी

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतीला जोडधंदा म्हणून पोल्ट्री व्यवसाय चांगलाच बहरला आहे. मात्र पोल्ट्री व्यवसायात कोंबड्यांचे आजारपण, रोग आणि त्यावर नियंत्रण मिळवणे, ही पोल्ट्री उत्पादक शेतकऱ्यांसमोर सर्वात समस्या असतात. पोल्ट्री व्यवसायात नेमकी काय काळजी घेतली पाहिजे. जेणेकरून कोंबड्यांचे आरोग्य चांगले राहून, शेतकऱ्यांना पोल्ट्री व्यवसायातून अधिकाधिक उत्पन्न मिळवण्यास मदत होते. याच पार्श्वभूमीवर भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) पोल्ट्री व्यवसायाबाबतच्या काही मार्गदर्शक सूचनांबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे.



अशी करा पोल्ट्रीची उभारणी : भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आईसीएआर) आपल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटले आहे की, पोल्ट्री व्यवसायामध्ये सुरुवातीला पोल्ट्री उभारताना त्याची दिशा ही पूर्व-पश्चिम दिशेत असावी लागते. यामागील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे कमीत-कमी सूर्यप्रकाश हा पोल्ट्री फार्ममध्ये पडेल. ज्यामुळे पक्षांना तीव्र उन्हामुळे कोणतीही इजा होणार नाही. इतकेच नाही तर आपण पोल्ट्री उभारताना दोन शेतकऱ्यांच्या पोल्ट्रीमध्ये किमान एक किलोमीटर अंतर असायला हवे. ज्यामुळे साथ रोगांच्या प्रादुर्भावातून होणारे आर्थिक नुकसान टळण्यास मदत होते.

वेळोवेळी लसीकरण गरजेचे : भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आईसीएआर) म्हटले आहे की, कोंबड्यांना होणाऱ्या रोगकारक जंतूंचा प्रसार एका पोल्ट्री फार्ममध्ये प्रवेश करण्यापासून किंवा मग एका पोल्ट्री फार्ममधून, दुसऱ्या पोल्ट्री फार्ममध्ये पसरण्यापासून रोखण्यासाठी बायो-सेक्युरिटी हा सर्वात चांगला पर्याय आहे. कोंबड्यांना वेळोवेळी लसीकरण करणे खूप गरजेचे आहे. ज्यामुळे घातक रोगांपासून पक्ष्यांना वाचवण्यासाठी लसीकरणामुळे मोठी मदत होते.

पक्ष्यांमध्ये रोग पसरण्याची कारणे : कोंबड्यांमध्ये बहुतेक रोग हे एका पोल्ट्री फार्म मधून, दुसऱ्या दुसऱ्या पोल्ट्रीमध्ये कामगार, उपकरणे आणि वाहने यांच्या येण्या-जाण्यामुळे पसरतात. कोंबड्यांना श्वसनाशी संबंधित आजार हे प्रामुख्याने हवेतील धुळी कणांमुळे पसरतात. हॅचरीमधून अर्थात कोंबड्यांच्या अंडी उबवण्याच्या जागेतूनही रोगराई पसरण्याची शक्यता असते. उंदीर, वन्यप्राणी आणि भटक्या पक्ष्यांमुळेही संसर्गजन्य रोग पसरतात. माश्या, डास इत्यादी बाह्य परजीवी रोग पसरवण्याचे काम करतात.

दूषित धान्य, धान्याच्या पिशव्या, वाहने आणि पोल्ट्री फार्म बेडिंग जसे की मधाचे भुसे, लाकडाचा भुसा इत्यादी रोग पसरवण्याचे माध्यम आहेत. संसर्गजन्य रोगांची लागण झालेली कोंबडी अनेक रोगांचे वाहक म्हणून काम करते. त्यामुळे वेळीच असे पक्षी दूर करावेत.

रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय : पोल्ट्री फार्म बांधताना त्याची दिशा पूर्वेकडून-पश्चिमेकडे असावी. यामुळे तीव्र सूर्यप्रकाशाच्या उष्णतेपासून पक्षांचा बचाव करण्यास मदत होते. दोन शेतकऱ्यांच्या पोल्ट्री फार्ममध्ये किमान १ किमी अंतर असावे. तर हॅचरी युनिट अर्थात अंडी उबवण्याची जागा आणि अन्य कोंबड्यांचे व्यवस्था वेगवेगळी असावी. पोल्ट्री फार्म हा काँक्रीटचा असावा. तो जमिनीपासून किमान तीन फूट उंच असावा. जेणेकरून उंदरांचा प्रादुर्भाव होत नाही. पोल्ट्री फार्म भोवती कोणतेही झाडे नसावीत. झाडांमुळे इतर पक्षी पोल्ट्रीजवळ येऊन रोगराईला आमंत्रण मिळते. पोल्ट्री फार्मच्या प्रवेशद्वारावर आणि प्रत्येक पोल्ट्री हाऊसच्या प्रवेशद्वारावर फूट बाथ (जंतुनाशक द्रावण) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे पोल्ट्री फार्ममध्ये जाताना पायांपासून संसर्गजन्य रोग, कोंबड्यांमध्ये पसरणार नाही.

# सोयाबीनचे विविध वाण आणि वैशिष्ट्ये

राज्यांत गेल्या अडीच-तीन दशकापासून सोयाबीन पिकाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे, कमी कालावधीत,कमी खर्चात,कमी श्रमात आणि पुरेशा पावसावर येणाऱ्या पिकामुळे शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा झाल्याचे दिसून येत आहे. राज्यातील कृषि विद्यापीठांनी कमी, मध्यम व उशिरा कालावधीत तयार होणारे, अवर्षणास प्रतिकारक्षम, कीड व रोग प्रतिकारक, चांगले उत्पादन देणारे वाण विकसित केले आहेत.

कमी कालावधीत परिपक्व होणारे वाण : जे एस ९३०५, एम ए यु एस १५८, एम ए यू एस ६१२ , एम ए सी एस १४६०, एन आर सी १५७. मध्यम कालावधीत परिपक्व होणारे वाण : फुले दुर्वा, फुले किमया, एम ए यू एस ७२५ , एम ए यू एस ७१, सुवर्ण सोया, जे एस ३३५. उशिरा कालावधीत परिपक्व होणारे वाण : फुले संगम , फुले किमया. दुष्काळ सदृश्य परिस्थितीत वाण : एमएयूएस-७१(समृद्धी), एमएयूएस ६१२, एमएसीएस १४६०, जे एस ९५-६०. फुले संगम (७२६) : दक्षिण महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्यांत लागवडीसाठी शिफारस. परिपक्वता कालावधी - १००-१०५ दिवस. वैशिष्ट्ये - जाड व चमकदार दाणा,भारी जमिन व व्यवस्थापन चांगले असल्यास उत्पादन चांगले ,तांबेरा रोगास प्रतिकारक. हेक्टरी उत्पादन - २५-३० क्विं./हे.

फुले किमया (७५३) : दक्षिण महाराष्ट्र,तेलंगणा, आंध्रप्रदेश कर्नाटक, गुजरात, दक्षिण राजस्थान, झारखंड, छत्तीसगड ओरिसा आणि ईशान्यकडील राज्यासाठी शिफारस. परिपक्वता कालावधी - १००-१०५ दिवस. वैशिष्ट्ये - जाड व चमकदार दाणा, तांबेरा रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन - २७-३२ क्विं./हे. फुले दुर्वा (९९२) : दक्षिण महाराष्ट्र , तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्यांत लागवडीसाठी शिफारस.



परिपक्वता कालावधी - ९५-१०० दिवस. वैशिष्ट्ये - तांबेरा रोग,खोडमाशी किडीस प्रतिकारक्षम

हेक्टरी उत्पादन : २७-३५ क्विं./हे. फुले अग्रणी (३४४) : दक्षिण महाराष्ट्र. तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्यासाठी शिफारस. परिपक्वता कालावधी - १००-१०५ दिवस. वैशिष्ट्ये- तांबेरा रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन - २५-३० क्विं./हे. फुले कल्याणी (२२८) : परिपक्वता कालावधी - ९५-१०० दिवस. वैशिष्ट्ये - दाण्याचा रंग फिकट पिवळा, मध्यम आकाराचे दाणे, तांबेरा रोगास कमी बळी पडणारा. हेक्टरी उत्पादन - २३-२५ क्विं./हे. एम ए यू एस -७१ (समृद्धी) : परिपक्वता कालावधी - ९५-१०० दिवस. वैशिष्ट्ये - मध्यम ते भारी जमिनीत लागवडीस योग्य, शेंगा न फुटणारे वाण, अवर्षणासं प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन - २८-३० क्विं./हे. एमएयूएस -१५८ : परिपक्वता कालावधी - ९३ -९८ दिवस. वैशिष्ट्ये - हलक्या व मध्यम जमिनीत लागवडीस योग्य. हेक्टरी उत्पादन - २६-३१ क्विं./हे. एमएयूएस -६१२ : परिपक्वता कालावधी - ९४ - ९८ दिवस. वैशिष्ट्ये - उंच वाढणारे, वातावरण बदलामध्ये तग धरणारे, दुष्काळ सदृश्य परिस्थितीत व आंतरपीक पद्धतीत अतिशय योग्य वाण. हेक्टरी उत्पादन-: ३०-३२ क्विं./हे. मएयूएस १६२ : परिपक्वता कालावधी - १००-१०३ दिवस. वैशिष्ट्ये - उभट वाण, परिपक्व. हेक्टरी उत्पादन - २८-३० क्विं./हे. पीडीकेव्ही (यलो गोल्ड) (एएमएस १००१) : परिपक्वता कालावधी - ९५-१०० दिवस. वैशिष्ट्ये - मध्यम कालावधीत येणारे,मध्यम ते भारी जमिनीत लागवड केल्यास हमखास चांगले उत्पादन, मूळकुज व विषाणूजन्य रोगास प्रतिकारक्षम, परिपक्वते नंतर १० दिवसापर्यंत शेंगा फुटण्यास प्रतिकारक. हेक्टरी उत्पादन - २२-२६ क्विं./हे. पीडीकेव्ही सुवर्ण सोया (एएमएस- एमबी ५-१८) : परिपक्वता कालावधी - ९८-१०२ दिवस. वैशिष्ट्ये - मूळकुज, खोडकुज, पानावरील ठिपके या रोगास प्रतिकारक, चक्रीभुंगा, खोडमाशी या किडीस मध्यम प्रतिकारक. हेक्टरी उत्पादन - २४-२८ क्विं./हे. पीडीकेव्ही पूर्वा (एएमएस २०१४-१) : पूर्व भारतातातील राज्याकरिता प्रसारित, पूर्व विदर्भातील जास्त पर्जन्यमान असलेल्या भागात उपयुक्त

परिपक्वता कालावधी : १०२-१०५ दिवस. वैशिष्ट्ये - पिवळा मोझॅक या रोगास प्रतिकारक, चक्रीभुंगा, खोडमाशी या किडीस मध्यम प्रतिकारक, परिपक्वतेनंतर १० दिवसापर्यंत शेंगा फुटण्यास प्रतिकारक. हेक्टरी उत्पादन - २२-२६ क्विं./हे. एमएसीएस १४६० : परिपक्वता कालावधी - ९५ दिवस. वैशिष्ट्यं - चांगले उत्पादन देणारे वाण, कमी कालावधित पक्व होणारा, दुष्काळसदृश परिस्थितीत चांगले उत्पादन देणारे वाण, कीड व रोगास कमी बळी पडते, यांत्रिक कापणीस योग्य. हेक्टरी उत्पादन - २२-३८ क्विं./हे. एम ए सी एस १४०७ : परिपक्वता कालावधी - १०४ दिवस. वैशिष्ट्ये - काढणीच्या वेळेस शेंगा फुटत नाही ,खोडमाशी प्रतिरोधक. हेक्टरी उत्पादन - २० - ३० क्विं./हे. एनआरसी ३७ (अहिल्या -४) : मध्य प्रदेश, महाराष्ट्र ,राजस्थान या राज्यांत लागवडीसाठी शिफारस. परिपक्वता कालावधी - ९६-१०२ दिवस. वैशिष्ट्ये - चांगला उत्पादन देणारा वाण. हेक्टरी उत्पादन - ३५-४० क्विं./हे. एनआरसी १५७ : परिपक्वता कालावधी - ९४ दिवस. वैशिष्ट्ये - उशिरा लागवडीसाठी ( २० जुलै पर्यंत) शिफारशीत वाण. हेक्टरी उत्पादन - १६-२० क्विं./हे. एनआरसी १३८ (इंदोर सोया १३८) : परिपक्वता कालावधी - ९०-९४ दिवस. वैशिष्ट्ये - तांबेरा आणि पिवळा मोझॅक रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन - २५-३० क्विं./हे. जे एस ९३-०५ : परिपक्वता कालावधी - ८५-९०. वैशिष्ट्ये - लवकर येणारे वाण, हलकी व मध्यम जमिन, न पडणारे व शेंगा न फुटणारे वाण. हेक्टरी उत्पादन - २५-२८ क्विं./हे.




### महत्वाच्या घटना

१६५९ : अफझलखानाशी मुकाबला करण्यासाठी शिवाजी राजे राजगडवरुन निघून प्रतापगड येथे पोचले.
१८०१ : फ्रेन्च खगोलविद जॉन लुई पॉन याने 'पॉन' धूमकेतूचा शोध लावला.
१८९३ : कोकिची मिकीमोटो यांनी पहिला 'कल्चर्ड' मोती मिळवला.
१९०८ : लोकमान्य टिळकांना मंडालेची ६ वर्षाची शिक्षा झाली.
१९१९ : नेदरलँड देशामध्ये आठ तासांचा दिवस आणि रविवार सुट्टी असा कामगारांसाठी कायदा लागू झाला.
१९२१ : मंगोलियन पीपल्स रिपब्लिक स्थापना.
१९३० : ऑस्ट्रेलियाचे सर डोनाल्ड ब्रॅडमन यांनी इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात एकाच दिवसात विक्रमी नाबाद ३०९ धावा केल्या.
१९५० : पाकिस्तान आंतरराष्ट्रीय नाणेनिधिचा सदस्य बनला.
१९५५ : अमेरिकेने आपल्या चलनावर 'देवावर आमचा विश्वास आहे'असे छापण्याचे ठरवले.
१९६२ : पहिले ट्रान्सअटलांटिक उपग्रह दूरदर्शन प्रसारण झाले.
१९६२ : प्रोजेक्ट अपोलो नासाने चंद्रावर अंतराळवीरांना उतरवण्याचे आणि त्यांना पृथ्वीवर परत आणण्याची घोषणा केली.
१९७१ : चिलितील तांब्याच्या खाणींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९७७ : मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांना प्रेसिडेंशियल मेडल ऑफ फ्रीडमने सन्मानित करण्यात आले.
१९७९ : अमेरिकेची 'स्कायलॅब' ही अंतराळातील प्रयोगशाळा रात्री दहाच्या सुमारास हिंदी महासागरात कोसळली.
१९८९ : जागतिक लोकसंख्या दिन सुरुवात.
१९९४ : दिल्लीच्या पोलिस महानिरीक्षक (तुरुंग) किरण बेदी यांना 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२००१ : आगरताळा ते ढाका या शहरांदरम्यान बससेवा सुरू झाली.
२००६ : मुंबईत उपनगरी गाड्यांमध्ये झालेल्या स्फोटांत २०९ लोक ठार तर ७१४ लोक जखमी झाले.
२०१० : साली स्पेन देशाने नेदरलँड्स फुटबॉल संघाचा पराभव करून फुटबॉल विश्वचषक जिंकला.
२०२१ : रिचर्ड ब्रॅन्सन हे त्याच्या व्हर्जिन गॅलेक्टिक अंतराळयानाद्वारे अंतराळात जाणारे पहिले सामान्य नागरिक बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५७ : भारतीय राजकारणी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे अमरावती येथील अध्यक्ष सी. शंकरन नायर यांचा जन्मदिन.
१८८९ : नारायण हरी आपटे कादंबरीकार, चित्रपट कथालेखक. 'सुखाचा मूलमंत्र', 'पहाटेपुर्वीचा काळोख', 'उमज पडेल तर', 'एकटी' या त्यांच्या काही प्रसिद्ध सामाजिक कादंबर्या होत. 'कुंकू' हा गाजलेला चित्रपट त्यांच्या 'न पटणारी गोष्ट' या कादंबरीवर आधारलेला होता. (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९७१ कोरेगाव, जिल्हा सातारा)
१८९१ : परशुराम कृष्णा गोडे प्राच्यविद्या संशोधक. त्यांनी ४०० विषयांवर संशोधन करुन लिहीलेले निबंध ८ खंडात प्रसिद्ध झाले आहेत. (मृत्यू: २८ मे १९६१)
१९०२ : भारतीय शीख राजकीय नेता व भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेता आणि भारताचे पहिले संरक्षण मंत्री सरदार बलदेव सिंह यांचा जन्मदिन.
१९२१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: ९ एप्रिल २००१)
१९२३ : टुण टुण भारतीय अभिनेत्री आणि कॉमेडियन (निधन: २४ नोव्हेंबर २००३)
१९२७ : थिओडोर हेरॉल्ड मॅमन लेसरचे निर्माते (निधन: ५ मे २००७)
१९३४ : जियोर्जियो अरमानी कंपनीचे स्थापक जियोर्जियो अरमानी यांचा जन्म.
१९५३ : सुरेश प्रभू केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्री, उद्योगमंत्री, ऊर्जामंत्री आणि अवजड उद्योग मंत्री
१९५६ : भारतीय-अमेरिकन लेखक आणि शैक्षणिक अमिताव घोष यांचा जन्म.
१९६० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता कुमार गौरव यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-अमेरिकन कादंबरीकार आणि लघु कथालेखक झुम्पा लाहिरी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६३० : कलकत्ता शहरात आलेली पहिली विदेशी महिला बेगम रेजाबिबेह सुकिएस यांचे निधन.
१९१२ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचे निधन.
१९८९ : सर लॉरेन्स ऑलिव्हिये ब्रिटिश अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता (जन्म: २२ मे १९०७)
१९९४ : रणांगणावरील असामान्य कामगिरीबद्दलचा 'परमवीर चक्र' हा सर्वोच्च सन्मान मिळवणारे मेजर (निवृत्त) रामराव राघोबा राणे यांचे निधन. हा सन्मान मिळवणारे 'बॉम्बे सॅपर्स'चे आणि महाराष्ट्रातील एकमेव अधिकारी होते. (जन्म:)
२००३ : सुहास शिरवळकर कादंबरीकार आणि रहस्यकथालेखक (जन्म: १५ नोव्हेंबर १९४८)
२००३ : पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक, नाटककार आणि अभिनेते भीष्म साहनी यांचे निधन.
२००९ : शांताराम नांदगावकर गीतकार (जन्म: १९ आक्टोबर १९३६)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.११ जुलै २०२६ ५



# जामखेडचे दुय्यम कारागृह कायमस्वरूपी बंद

## ६२ आरोपींचे कडेकोट बंदोबस्तात नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थलांतर





जामखेड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या आदेशानुसार जामखेड येथील दुय्यम कारागृह कायमस्वरूपी बंद करण्यात आले असून, येथील न्यायालयीन कोठडीतील ५९ पुरुष व ३ महिला अशा एकूण ६२ आरोपींना बुधवारी (दि. ९) कडेकोट पोलीस बंदोबस्तात नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात स्थलांतरित करण्यात आले.

यापुढे जामखेड न्यायालयात न्यायालयीन कोठडी मिळालेल्या आरोपींचा मुक्काम नाशिक मध्यवर्ती कारागृहातच राहणार आहे. राज्य शासनाने सुरक्षेच्या दृष्टीने तसेच जीर्ण झालेल्या कारागृहांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक कारागृहांच्या इमारती मोडकळीस आल्याने तसेच काही ठिकाणी कैदी पळून जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार कैद्यांना जवळच्या जिल्हा किंवा मध्यवर्ती कारागृहात टप्प्याटप्प्याने स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### कडेकोट बंदोबस्तात स्थलांतर प्रक्रिया

जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी आणि खर्डा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींच्या स्थलांतराची संपूर्ण प्रक्रिया शांततेत व कडेकोट पोलीस बंदोबस्तात पार पडली. यापुढे जामखेड न्यायालयीन कोठडीतील सर्व आरोपींचा मुक्काम नाशिक मध्यवर्ती कारागृहातच होणार आहे.

त्या अनुषंगाने जामखेड येथील दुय्यम कारागृहातील सर्व ६२ आरोपींना दुपारी सुमारे दोन वाजता पोलिसांच्या वाहन ताफ्यातून नाशिककडे रवाना करण्यात आले.

स्थलांतरावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कारागृह परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शांततेत, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आली. आरोपींना निरोप देण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांनी कारागृहाबाहेर मोठी गर्दी केली होती. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याचे भावनिक चित्र यावेळी पाहायला मिळाले.

या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान सर्व प्रशासकीय व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. जामखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी तसेच खर्डा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



# कृषी विद्यापीठातील प्राध्यापक भरतीला विद्यार्थ्यांचा विरोध

## मत्स्यविज्ञान महाविद्यालय उदगीरच्या विद्यार्थ्यांचा आंदोलनाचा इशारा

उदगीर। प्रतिनिधी

झाशी येथील राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक (अॅक्काकल्चर) पदावर बी.एफ.एस्सी. ही अनिवार्य पदवी नसलेल्या उमेदवाराची नियुक्ती करण्यात आली आहे. या बेकायदेशीर प्रक्रियेचा महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत असलेल्या उदगीर येथील मत्स्यविज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तीव्र निषेध नोंदवला आहे. मत्स्य शास्त्रातील अध्यापन व संशोधनासाठी बी.एफ.एस्सी. ही मूलभूत व्यावसायिक पात्रता असणे आवश्यक आहे. मात्र, या पात्रतेविना झालेल्या नियुक्तीमुळे शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणी पारदर्शक चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी राष्ट्रपती, पंतप्रधान कार्यालय आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेकडे केली आहे.

या अन्यायकारक भरती प्रक्रियेला मंगळूर आणि जबलपूर येथील मत्स्यशास्त्र महाविद्यालये व माजी विद्यार्थी संघटनांनीही विरोध दर्शवला आहे. शिक्षक भरतीत निर्धारित शैक्षणिक पात्रतेचे काटेकोर पालन न झाल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा उदगीरच्या विद्यार्थ्यांनी दिला.

# गॅस टाक्यांच गोडाऊन फोडून सिलेंडर चोरी करणारी टोळी पकडली



जालना। प्रतिनिधी

गॅस टाक्याचं गोदाम फोडुन ६० गॅस सिलेंडर चोरी करणारे टोळी पोलिसांनी पकडले व गॅस टाकी सिलेंडर जप्त करण्यात आल्या. सदरील घटना कुंभारपिंपळगांव, ता. घनसावंगी जि. जालना येथे एच.पी. गॅस गोडाऊन फोडुन ६० एच.पी. गॅसचे सिलेंडर अज्ञात इसमांनी चोरी केलेबाबत फिर्यादी गोपाल राधेश्याम लोया, यांनी घनसावंगी पोलीस ठाणे गु.र.क्र.३६०/२०२६ कलम ३०३(२), ३२४(२) भा.न्यां.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्हा उघड करुन गुन्हयातील आरोपी जेरबंद करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांनी पोलीस पथकास सुचना दिल्या होत्या.

त्यानुषंगाने अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन व गुप्तबातमीदाराच्या मदतीने माहिती घेत असतांना सदरचा गुन्हा हा आरोपी राजेश लाला पवार, वय-३४ वर्ष, रा. इंदिरानगर, पाथरी ता. पाथरी जि.परभणी, गणेश प्रभु काळे, वय-२६ वर्ष, रा.इंदिरानगर, पाथरी ता. पाथरी जि. परभणी यांनी त्यांच्या साथीदारासह केला असल्याचे दिसुन आल्याने दोन्हीही आरोपीतांना पाथरी, जि. परभणी येथुन ताब्यात घेतले असुन त्यांच्या ताब्यातुन खालीलप्रमाणे मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच आरोपीतांनी दिनांक २९/०३/२०२६ रोजी खवणे पिंप्री, ता. पाथरी जि. परभणी येथील इंडेन गॅस गोडाऊन सुध्दा फोडुन सिलेंडर चोरी केली असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आरोपीतांना घनसावंगी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात पुढील कारवाईकामी दिले आहे.

घनसावंगी पोलीस ठाणे, घनसावंगी, गु.र.नं.३६०/२०२६ कलम ३०३(२),३२४(२) भा.न्यां. सं पाथरी पोलीस ठाणे, पाथरी जि. परभणी गु.र.नं. १५६/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) भा.न्यां.संआरोपी राजेश लाला पवार, गणेश प्रभु काळे,जप्त मुद्देमाल रु.१,६६,९२०/- किंमतीचे ३६ भरलेले व २४ रिकामे घरगुती एच.पी. गॅस सिलेंडर जु.वा. किं.अ. कारवाई करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू , मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग अंबड श्री. सिध्देश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकांनी ही कारवाई केली सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद एखंडे, सतिष श्रीवास, कैलास चेके,

# माजी आमदारांचे आरोप हास्यास्पद; ठेवीदारांना न्याय मिळून दिला-आ. अर्जुनराव खोतकर

जालना। प्रतिनिधी

जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील गैरव्यवहारामुळे अडचणीत आलेल्या शेकडो सभासद, ठेवीदार आणि गुंतवणूकदारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळावी, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. राज्याच्या चालू अधिवेशनात हा प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडून शासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आवश्यक कार्यवाही सुरू केली. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार ठेवीदारांना त्यांची रक्कम मिळण्यासाठी प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे आश्वासन शासनाने दिले आणि त्यानुसार पुढील कार्यवाहीही करण्यात आली, असा खुलासा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केला.आमदार खोतकर म्हणाले की, शासनाने आवश्यक सूचना केल्यानंतर रिझर्व्ह बँकेमार्फत जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचा सुमारे ९३ कोटी ३६ लाख रुपयांचा विमा प्रस्ताव मंजूर झाला. त्यामुळे ठेवीदारांना त्यांच्या हक्काची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. हा निर्णय हजारो ठेवीदारांसाठी दिलासादायक असून, त्यासाठी आपण सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे हे फलित आहे.

याच पार्श्वभूमीवर *माजी आमदारांनी केलेले आरोप पूर्णपणे बिनबुडाचे*, दिशाभूल करणारे आणि हास्यास्पद आहेत. श्रेयवादाचे राजकारण करणे हा आमचा स्वभाव नाही. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविणे हेच आमचे कर्तव्य असून, त्यातूनच आम्हाला समाधान मिळते. त्यामुळे अशा निराधार आरोपांना कोणतेही महत्त्व नाही. बँकेतील गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळापासूनच आपण ठेवीदार, सभासद आणि खातेदारांच्या बाजूने ठामपणे उभे राहिलो. त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळावेत, यासाठी शासन, संबंधित विभाग आणि विविध पातळ्यांवर सातत्याने पाठपुरावा केला. ही बाब जालना जिल्ह्यातील जनतेला चांगलीच माहीत आहे. जनतेच्या हिताचे काम होत असल्यामुळे काहींना राजकीय पोटदुखी होत असेल, तर त्यासाठी आम्ही जबाबदार नाही. जनतेची कामे होऊ नयेत, विकासाच्या प्रश्नांवर अडथळे निर्माण व्हावेत आणि त्यातून राजकारण करता यावे, हा काहींचा उद्देश असल्याचे दिसून येते. मात्र अशा प्रकारच्या आरोपांमुळे सत्य बदलत नाही. जालना मर्चंट बँकेतील ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी यापुढेही आपण कटिबद्ध राहणार असून, प्रत्येक सभासद आणि ठेवीदाराला त्याच्या हक्काची रक्कम मिळेपर्यंत आपला पाठपुरावा सुरूच राहील, अशी ग्वाही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली. तसेच, खरे तर बँकेत ज्यांच्या रक्कमा अडकल्या आहेत त्यांच्यामध्ये आता एकप्रकारे चांगली भावना निर्माण झाली आहे.जनतेला वस्तुस्थिती पूर्णपणे माहिती असून, केवळ प्रसिद्धीसाठी आणि दिशाभूल करण्याच्या उद्देशाने करण्यात येणाऱ्या अशा बिनबुडाच्या आरोपांना जनता कोणतीही किंमत देणार नाही, असा विश्वासही आमदार खोतकर यांनी व्यक्त केला.

# व्यापाऱ्यांना मिळणार उद्यम आधार प्रमाणपत्र-हस्तीमल बंब

## सर्व व्यापाऱ्यांनी शिबिराचा लाभ घ्यावा-सतीष पंच

जालना। प्रतिनिधी

व्यापारी महासंघ व जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा जालना च्या वतीने उद्योग व्यवसाय करणारे महिला-पुरुष साठी येत्या रविवारी दि. १२ जुलाई २०२६ रोजी, सकाळी ९:०० ते संध्याकाळी ६:०० वाजे पर्यंत एक दिवसीय शिबीर जैन भवन, सकलेचा नगर, भोकरदन रोड, जालना येथे प्रथमच आयोजित करण्यात आले आहे, उपस्थित व्यापाऱ्यांना उद्यम आधार प्रमाणपत्र मिळणार, अशी माहिती जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी दिली आहे. शासनाचे उद्योग मंत्रालय, जिल्हा उद्योग केन्द्र मार्फत अनेक योजना, अनुदान, नाममात्र व्याजाने कर्ज देण्यात येते. हे सर्व लाभ घेण्यासाठी उद्यम आधार प्रमाण पत्र काढून घेणे अंत्यत आवश्यक आहे.

भारत सरकारच्या मंत्रालया कडून दिले जाणारे अधिकृत प्रमाणपत्र आहे. त्यामुळे आपल्या उद्योग व्यवसायाला शासकीय मान्यता मिळते. यात बैंक कर्जावर सुलभ सुविधा, कमीत कमी व्याजाने कर्ज, शासकीय टेंडर यात प्राधान्य, आर्थिक व्यवहारात कायदेशीर अधिकार, तंत्रज्ञान उन्नतीकरण योजनाचा लाभ, ट्रेड मार्क घेणे, - राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय प्रदर्शनात स्टॉलसाठी सहभागी होण्यासाठी सहाय्य असे अनेक प्रकारचे लाभमिळू शकतात. हा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर प्रमाणपत्रासाठी मदत होते म्हणून या शिबीराला विशेष महत्व आहे. उद्यम आधार प्रमाण पत्र काढण्यासाठी शिबीरात येताना आपले आधार कार्ड, पॅन कार्ड, बैंक पासबुक अथवा कॅन्सल चेक सोबत आणावे. या शिबीरासाठी श्री बंब सोबत सतिष पंच, सुखदेव बजाज, अंकुश राऊत, मो. कसीम बावला, प्रविण मोहता, संदीप काबरा, अतुल लड्ढा, जगननाथ थोटे, महिला आघडीची सौ. सिता मोहिते पाटील, सौ आनंदी अय्यर, सौ. प्रिया जोशी इ. परिश्रम घेत आहे. अधिक माहितीसाठी समाधान खरात यांच्याशी संपर्क साधावा. तरी जालना शहरातील सर्व तालुका अंतर्गत ग्रामीण भागातील लहान-मोठे उद्योग-व्यवसाय करणारे महिला-पुरुष यांनी आवर्जुन मोठ्या संख्येने या शिबीरात उपस्थित राहुन शासनाच्या उद्यम आधार प्रमाण-पत्र काढून घ्यावा. व्यापाऱ्यांनी या सुर्वण संधीचा लाभ घ्यावा असे अहवान जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब व राज्य उपाध्यक्ष सतीष पंच यांनी केले आहे.

# विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर विभागात रिक्त जागांवर थेट प्रवेश

बीड : छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व धाराशिव उपपरिसर येथील पदवी व पदव्युत्तर विभागातील क्षमतेपेक्षा कमी नोंदणी झालेल्या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना थेट प्रवेश देण्यात येणार आहेत.या संदर्भात पदव्युत्तर विभागाच्या वतीने विभागांना निर्देश देण्यात आले. प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते यांनी विभाग प्रमुखांशी चर्चा करून रिक्त जागा संदर्भात आढावा घेतला.यानंतर पदव्युत्तर विभागाच्या वतीने सादर केलेल्या प्रस्तावास कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी मान्यता दिली आहे.पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांत रिक्त जागांवर तसेच क्षमतेपेक्षा कमी नोंदणी झालेल्या विभागात इच्छुक विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्यात मान्यता देण्यात आली आहे.

# जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारणअंतर्गत विकासकामांच्या प्रगती आढावा बैठक

जालना। प्रतिनिधी

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२६-२७ मधील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया, मनपा आयुक्त अंजली शर्मा जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल यांनी राज्याचे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या निर्देशानुसार सर्व विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने कामकाज करण्याच्या सूचना दिल्या. सन २०२५-२६ आणि त्यापूर्वीच्या वर्षांतील विभागनिहाय मंजूर निधी, त्यातील खर्च, तसेच सन २०२३-२४ व त्यानंतरच्या वर्षांतील खर्च न झालेल्या निधीबाबत कारणांसह सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले.



यावेळी सन २०२५-२६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेल्या मात्र प्रत्यक्षात काम सुरू न झालेल्या सर्व योजनांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. अशा कामांची सद्यस्थिती, काम सुरू होण्यास झालेला विलंब आणि ती कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात आली. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीत पालकमंत्री यांनी दिलेल्या सूचनांनुसार कोणकोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याचा आढावा ही बैठकीत सादर घेण्यात आला. प्रत्येक विभागाने शासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी मित्तल यांनी यावेळी दिले. सन २०२६-२७ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा विकास आराखडा, गतिमान प्रशासन, व्यक्तिमत्त्व विकास, जिल्हा विकास आराखडा (महसूल व भांडवली) तसेच शाश्वत विकास ध्येय अंतर्गत प्रस्तावित योजनांवरही सविस्तर चर्चा झाली. या योजनांचे प्रस्ताव वेळेत सादर करून विकासकामांना गती देण्याचे आवाहन करण्यात आले. याशिवाय जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत सन २०२६-२७ मध्ये हाती घेण्यात येणाऱ्या विकासकामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सन २०२५-२६ मध्ये झालेल्या निधी खर्चाचा आढावा घेऊन खर्चाची गती वाढविण्यावर भर देण्यात आला. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी मित्तल यांनी सर्व विभाग प्रमुखांनी समन्वयाने काम करत शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार विकासकामे वेळेत पूर्ण करावीत. तसेच उपलब्ध निधीचा शंभर टक्के विनियोग सुनिश्चित करावा आणि प्रलंबित प्रस्ताव व अहवाल विहित मुदतीत सादर करावेत, असे निर्देश दिले. यावेळी बैठकीत विविध विभागांच्या योजनांची अंमलबजावणी, निधी खर्च, प्रलंबित कामे तसेच आगामी वर्षातील विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, नियोजन विभागाचे अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# हिंगोलीत अवैध सावकारीवर धडक कारवाई

## ११ खरेदीखत, ९ कोरे बाँड आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यातील चिंचोळी निळोबा येथे जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुफाटे यांच्या पथकाने गुरुवारी ता. ९ सकाळी सात वाजता अवैध सावकारीच्या संशयावरून एका घरावर छापा टाकला. यामध्ये ११ खरेदीखत, ९ कोरे बॉण्ड, पाच चिठ्ठा, सात कॅलेंडर व इतर साहित्य जप्त केले आहे. या कारवाईमुळे अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.औंढा नागनाथ तालुक्यातील चिंचोली निळोबा येथील सुंदरराव मोरे यांच्या विरुध्द अवैध सावकारीची तक्रार प्राप्त झाली होती. यामध्ये तक्रारदाराने काही रक्कम घेऊन त्यांची जमीन मोरे यांच्या नावे करून दिली होती. सदर जमीन तक्रारदारच वहिती करीत होता. मात्र लिहून दिलेली जमीन परत केली जात नसल्याने तक्रारदाराने जिल्हा उपनिबंधक कार्यालयात तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीवरून जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे, सहकार अधिकारी बी. डी. पठाडे, ए. ए. वानखेडे, एस. जी. आंधळे, के. जी. घालेवाड, जमादार रोहिदास राठोड, महिला पोलिस कर्मचारी साधना शेळके यांच्या पथकाने आज सकाळी सात वाजता चिंचोली निळोबा येथे सुंदरराव मोरे यांच्या घरावर छापा टाकला. यामध्ये घरातील पेटी व इतर साहित्याची तपासणी केली असता त्यात जमीनीचे ११ खरेदी खत केल्याचे दिसून आले.

तसेच तीन बॉण्डवर जागेचे खरेदीखत झालेले आढळून आले तर ९ कोरे बॉण्ड, पैशाचे व्यवहार केलेल्या पाच चिठ्ठ्या, तसेच पैशाचे व्यवहार नमुद केलेल्या तारखेचे सन २०१७ पासूनच्या सात दिनदर्शिका सापडल्या. सदर सर्व साहित्य पथकाने पंचनामा करून जप्त करून जिल्हा उपनिबंधक कार्यालयात आणण्यात आले आहे. जिल्हा उपनिबंधकांच्या या कारवाईमुळे जिल्हयात अवैध सावकारी करणाऱ्या तथाकथीत सावकारांचे धाबे दणाणले आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

शनिवार दि.११ जुलै २०२६


# खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षांच्या घराबाहेर विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

## ■ कुटुंबाचा रुग्णालयात नेण्यास विरोध

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वारोळा येथील रहिवासी नवनाथ गणपत पवार यांनी आर्थिक व्यवहारातील लाखो रुपयांची थकीत रक्कम मिळत नसल्याचा आरोप करत टोकाचे पाऊल उचलले.दि १० जुलै शुक्रवार रोजी सकाळी ९:३० वाजण्याच्या सुमारास माजलगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जगन्नाथ जाधव (छत्र बोरगावकर) यांच्या स्वामी विवेकानंद नगर येथील निवासस्थानासमोर विषारी द्रव्य प्राशन करून नवनाथ पवार यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली.या प्रकारामुळे माजलगाव शहरात एकच खळबळ उडाली.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार,माजलगाव



### ● आर्थिक व्यवहारातून टोकाचे पाऊल

नवनाथ पवार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. या घटनेमुळे माजलगाव शहरात मोठी खळबळ उडाली असून आर्थिक व्यवहाराच्या वादातून एवढे टोकाचे पाऊल उचलले गेल्याने विविध स्तरांतून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान,या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत

तालुक्यातील वारोळा तांडा येथील नवनाथ पवार यांनी अनेक वर्षांच्या मैत्री व विश्वासाच्या नात्यामुळे खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जाधव यांना मोठी आर्थिक मदत केल्याचा दावा केला आहे.मात्र वारंवार मागणी करूनही संबंधित रक्कम परत मिळाली नसल्याने न्याय मिळावा या मागणीसाठी त्यांनी दि १५ जून २०२६ पासून आपल्या कुटुंबासह दिपक जाधव यांच्या घरासमोर बेमुदत ◀◀ पान २ वर

### उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास कुटुंबीयांचा विरोध

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.मात्र विष प्राशन केलेल्या नवनाथ पवार यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास त्यांच्या कुटुंबीयांनी तीव्र विरोध केला. ''आमची थकीत रक्कम मिळावी, अन्यथा आमचा माणूस मेला तरी हरकत नाही,'' अशी आक्रमक भूमिका कुटुंबीयांनी घेतल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.सुमारे पाऊण तास चाललेल्या गोंधळानंतर महिला पोलिसांच्या उपस्थितीत पोलिसांनी नवनाथ पवार यांना ताब्यात घेऊन बळजबरीने रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

# ऊस शेतात गांजाची लागवड

## चकलांबा पोलिसांकडून ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात राबवलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई केली आहे. चकलांबा पोलीस स्टेशनच्या पथकाने सुरळेगाव शिवारातील ऊसाच्या शेतात केलेली गांजाची लागवड उद्ध्वस्त केली असून, तब्बल ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे चकलांबा पोलिसांनी सुरळेगाव शिवारातील गट क्रमांक ११३ मधील ऊसाच्या शेतावर छापा टाकला. या कारवाईत गांजाची लहान-मोठी २५३ झाडे जप्त करण्यात आली. या झाडांचे वजन १८४.४ किलो असून त्यांची अंदाजे किंमत ४६ लाख १० हजार रुपये आहे. याशिवाय ४ किलो ३०० ग्रॅम सुका गांजा (किंमत २ लाख ६ हजार ४०० रुपये) आणि ४५० ग्रॅम निमसुका गांजा (किंमत ११ हजार २५० रुपये) असा एकूण ४८ लाख २७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणी मनोज ऊर्फ बादल भगवान आंधळे (वय ३६, रा. नगद नारायण वस्ती, सुरळेगाव, ता. गेवराई) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल ◀◀ पान २ वर

### नागरिकांना आवाहन

अमली पदार्थांची लागवड, साठवणूक, विक्री किंवा वाहतूक याबाबत काही माहिती असल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या ९२७०२४३२०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बीड पोलिसांनी केले आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.

# पत्रकारांना प्रवानगी देऊन नगरपरिषद सभा दाखवा-खुर्शीद आलम

## नगराध्यक्ष व मुख्याधिकारीकडे तुतारी गटाची मागणी



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाच्या वतीने बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे मॅडम यांना निवेदन देण्यात आले यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब भाई उपस्थित होते, नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी साहेब यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की देशातील सर्वोच्च सभा म्हणजेच संसद भवन सभा व राज्यसभा आणि विधानपरिषद सभेचे प्रसारण केले जाते आहे, अगदी याच पार्श्वभूमीवर बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा बीड ◀◀ पान २ वर

# ना.पंकजाताई मुंडेंनी घेतली सुनेत्राताई पवार यांची भेट

● बीड जिल्ह्यातील विविध विकासाच्या मुद्द्यावर चर्चा
● परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमिपूजनाचेही दिले निमंत्रण

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन बीड जिल्हयाच्या विविध विकास प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली. परळी येथे होणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमिपूजनाचे निमंत्रण त्यांनी यावेळी सुनेत्राताईंना दिले.



ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुपारी देवगिरी बंगल्यावर उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेतली. या प्रसंगी बीड जिल्ह्याच्या विविध विकासकामांच्या संदर्भात त्यांच्याशी अतिशय सकारात्मक चर्चा झाली.या भेटी दरम्यान, परळी वैजनाथ येथे नव्यानेच होत असलेल्या 'पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या' भूमिपूजन सोहळ्याचे आग्रहाचे निमंत्रणही त्यांनी सुनेत्राताईंना दिले. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी आणि लोककल्याणाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास ना.पंकजाताईंनी यावेळी व्यक्त केला.



# तीन हजाराची लाच घेताना लाचखोर पकडला

बीड । प्रतिनिधी

दोन दिवसापूर्वीच महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यास ट्रॅपचा झटका दिल्यानंतर आज पुन्हा एक कारवाई बीडमध्ये करण्यात आली. जात पडताळणी प्रमाणपत्राच्या कामासाठी ३ हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारताना समाजकल्याण विभागातील अधिलेखापाल राठोड अण्णासाहेब गबरू याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी (दि.१०) रंगेहात पकडले.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या जात पडताळणी प्रमाणपत्रासंदर्भातील काम करून देण्यासाठी आरोपीने ३ हजार रुपयांची लाच मागितली होती. ◀◀ पान २ वर

# अवैध वाळू वाहतूक करणारा पिकअप जप्त; ९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



गेवराई । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या कडक आदेशानुसार, गेवराई पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई केली आहे. या मोहिमेत नऊ लाख सहा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१० जुलै २०२६ रोजी गेवराई पोलीस शहरात गस्त घालत असताना, रात्री १२:१५ च्या सुमारास शिवाजीनगर कोल्हेर रोडवर एक संशयास्पद पांढऱ्या रंगाचा अशोक लेलँड 'बडा दोस्त' पिकअप आढळून आला. पोलिसांनी या वाहनाची तपासणी केली असता, त्यात विनापरवाना अवैध वाळूची वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तत्काळ सदर पिकअप आणि चालकाला ताब्यात घेतले. या कारवाईत जप्त केलेल्या एकूण मालाची ◀◀ पान २ वर

# सीईओ जितिन रहमान यांनी केली शेतात पेरणी




बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील लोळदगाव येथील बळीराजा कृषी विज्ञान मंडळ संचलित शेतकरी प्रशिक्षण केंद्राला बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी शुक्रवार दिनांक १० जुलै रोजी भेट दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी तिफनीवर पेरणी केली. बीड जिल्हा ◀◀ पान २ वर

# बीड शहरात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

## नगरपालिकेने तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी



बीड । प्रतिनिधी

बीड शहरात शाळा व महाविद्यालये सुरू झाल्यानंतर वाहतुकीची व नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेषतः रात्री उशिरापर्यंत शिकवणी वर्ग सुरू असल्याने विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची ये-जा कायम असते. अशा परिस्थितीत शहरातील भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव चिंतेचा विषय ठरत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सारडा नगरी मार्केट परिसर, जिल्हा शासकीय रुग्णालय ते पालवन चौक या मार्गावर रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने भटकी कुत्री रस्त्यावर वावरत असतात. दुचाकी किंवा चारचाकी वाहन दिसताच कुत्र्यांचे थवे वाहनांच्या मागे ◀◀ पान २ वर

# महावितरणने तात्काळ उपाययोजना न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस तीव्र आंदोलन करणार-सावंत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात महावितरणच्या अनागोंदी व निष्काळजी कारभारामुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असुन यावर महावितरणने तात्काळ उपाययोजना न केल्यास आमचे नेते तथा आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या आदेशानुसार शेतकरी, नागरिक यांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेवतीने आंदोलन करण्याचा इशारा कार्यकारी अभियंता तेलगाव यांना दि. १० जुलै रोजी दिलेल्या लेखी निवेदनाव्दारे महादेव सावंत तालुका उपाध्यक्ष यांनी दिला आहे.



निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी-जास्त दाबाने वीजपुरवठा होणे, बिघाड झाल्यानंतर अनेक तास किंवा दिवस वीजपुरवठा पूर्ववत न होणे, तक्रारींकडे दुर्लक्ष करणे, कृषी पंपांना वेळेवर वीज उपलब्ध न होणे आणि जळालेले ट्रान्सफॉर्मर बदलण्यास होणारा विलंब यामुळे शेतकरी व नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच अनेक ठिकाणी वीज वाहिन्या व वीजखांब धोकादायक अवस्थेत असूनही त्यांची दुरुस्ती करण्यात येत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ◀◀ पान २ वर

# अपघाताची वाट न पाहता रस्ता सुरक्षित करा

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नागरिकांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

पात्रुडजीवनापूर मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना साईड पट्ट्या न भरल्याने वाहनचालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. त्यामुळे अपघात होण्यापूर्वीच संबंधित रस्ता सुरक्षित करण्यासाठी तातडीने साईड पट्ट्या भराव्यात, अशी मागणी नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भराव नसल्याने रस्ता आणि बाजूच्या जमिनीमध्ये उंचीचा ◀◀ पान २ वर

# कर्जमाफी शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश-राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील कर्जमाफी आंदोलनात शेतकरी हक्क मोर्चा हिरारीने सहभागी झाला शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने मागील उद्धव ठाकरे यांच्या कर्जमाफी योजना लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना या कर्जमाफी योजनेत लाभ मिळणार आहे हे शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश आले असे प्रतिपादन शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांनी केले.



या वेळी शेतकऱ्याने कर्जमाफी योजनेतील अटी शिथिल केल्यामुळे शेतकऱ्यांनी स्वगत केले. शेतकरी कर्जमाफी मधील अटी शर्ती मुळे अनेक शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार होते शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने शासनाच्या कर्जमाफी शासन निर्णयाची गावोगावी होळी केली. शेतकऱ्यांमध्ये गावो गावी जाऊन जनजागृती केली रोहित पवार यांच्या पंढरपूर येथील आंदोलनात शेतकरी हक्क मोर्चा सहभागी झाला. बीड जिल्हा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने कर्जमाफी आंदोलनाची धुरा सांभाळली तसेच छत्रपती संभाजीनगर येथील कर्जमाफी आंदोलनात शेतकरी हक्क मोर्चा हिरारीने सहभागी झाला शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने मागील उद्धव ठाकरे यांच्या कर्जमाफी योजना लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना या कर्जमाफी योजनेत लाभ मिळणार आहे ◀◀ पान २ वर

# मंगळवारी उमरी फाटा येथे पिकविमासाठी आंदोलन होणारच

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk